दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव • लातूर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक
बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१६१ | सोमवार दि.३१ ऑगस्ट २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

# ऑनलाइनच्या कटकटीत शेतमोजणीत अडथळे!

## भूमी अभिलेख विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

सभाजीनगर I प्रतिनिधी

**शेतजमिनीची मोजणी करून घेण्यासाठी शेतकऱ्यांना भूमी अभिलेख विभागाच्या कार्यालयाच्या अक्षरशः फेऱ्या माराव्या लागत आहेत. पूर्वी ऑफलाइन पद्धतीने अर्ज स्वीकारून शुल्क भरल्यानंतर मोजणीची कार्यवाही सुरू केली जात होती. मात्र, आता ऑनलाइन अर्जाची सक्ती करण्यात आल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. ऑनलाइन अर्ज दाखल करूनही मोजणी वेळेत होत नसल्याने अनेक शेतकरी त्रस्त झाले आहेत. त्यातच मोजणीच्या नोटिसा वेळेत न मिळाल्याने मोजणी रद्द होण्याचे प्रकारही समोर येत आहेत.**

शेतजमिनीची हद्द निश्चित करणे, बांधाबाबतचे वाद मिटविणे, जमीन खरेदी–विक्री, वाटणी तसेच विविध शासकीय कामांसाठी शेतमोजणीची आवश्यकता असते. त्यामुळे शेतमोजणीची प्रक्रिया सुलभ आणि वेळेत होणे अपेक्षित आहे. मात्र, प्रत्यक्षात शेतकऱ्यांना अर्जापासून ते मोजणीपर्यंत अनेक अडथळ्यांना सामोरे जावे लागत असल्याचे चित्र आहे. पूर्वी शेतमोजणीसाठी भूमी अभिलेख विभागाकडे ऑफलाइन अर्ज करता येत होता. मोजणीच्या प्रकारानुसार निर्धारित शुल्क भरून त्याची पावती कार्यालयात जमा केली जात होती. त्यानंतर अर्ज परिपूर्ण असल्याची कार्यवाही



करून मोजणीची प्रक्रिया पुढे नेली जात होती. त्यामुळे शेतकऱ्यांना आपली मागणी थेट कार्यालयात मांडता येत होती. मात्र ऑनलाइन प्रक्रियेमुळे अडचणी वाढल्या आहेत. आता शेतमोजणीसाठी संबंधित पोर्टलवर ऑनलाइन अर्ज दाखल करणे पान २ वर

### कार्यवाही वेळेत नाही

ऑनलाइन अर्ज दाखल केल्यानंतरही पुढील कार्यवाही वेळेत होत नसल्याची शेतकऱ्यांची तक्रार आहे. मोजणीची तारीख, नोटीस आणि प्रत्यक्ष मोजणी यामध्ये विलंब होत असल्याने शेतकऱ्यांना वारंवार कार्यालयात जावे लागत आहे. ऑनलाइन प्रक्रियेमुळे काम सोपे होण्याऐवजी शेतकऱ्यांचा वेळ आणि पैसा दोन्ही खर्च होत असल्याची नाराजी व्यक्त होत आहे.

### मराठवाड्यात अनेक अर्ज प्रलंबित

भूमी अभिलेख विभागाकडे शेतमोजणीसाठी केलेले अनेक अर्ज अद्याप प्रलंबित असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. ऑनलाइन अर्ज केल्यानंतर अर्जाची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठीही शेतकऱ्यांना कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागत असल्याची तक्रार आहे. अर्ज ऑनलाइन, मात्र पाठपुरावा करण्यासाठी प्रत्यक्ष कार्यालयात, अशी विसंगत परिस्थिती निर्माण झाली आहे.

## थोडक्यात...

### मनोज जरांगेंची भुमिका रास्त–अभिजीत दिपके

जालनाः मराठा आरक्षणाच्या मुद्यावरुन राज्यातील वातावरण पुन्हा एकदा तापले आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी शनिवारपासून आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे. मागण्या मान्य झाल्याशिवाय मागे हटणार नाही, असी भूमिका त्यांनी घेतली आहे. दरम्यान, त्यांच्या या आंदोलनासंदर्भात कॉकरोच जनता पार्टीचे प्रमुख अभिजीत दिपके यांनी प्रतिक्रिया दिली आहे. जर सरकारने समाजाच्या मुलांना चांगलं शिक्षण दिले असते आणि रोजगाराचे संधी दिली असती तर मनोज जरांगे सरांना आंदोलन करावे लागले असते का? असा सवाल दिपकेंनी उपस्थित केला. हे कुठून कुठे सरकारचा अपयश आहे, आज राज्यात सगळेजण आंदोलन करत आहेत असे दिपके म्हणाले. मराठा समाजाच्या मुलांना शिक्षण चांगले मिळत नाही, रोजगाराची संधी त्यांना मिळत नाहीत, असे दिपके म्हणाले. मी मनोज जरांगे यांना भेटणार असल्याचेही दिपके म्हणाले.

### राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे एडीसी मेजर ऋषभ सिंह यांचा राजीनामा

नवी दिल्लीः राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्यासोबत सावलीसारखे वावरणारे ४ पॅरा स्पेशल फोर्सेसचे अधिकारी मेजर ऋषभ सिंह सांम्ब्याल यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. त्यांनी भारतीय सैन्यातून मुदतपूर्व निवृत्ती (स्वेच्छानिवृत्ती) घेतली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे एडीसी म्हणून सेवा बजावताना ते आपल्या शिस्तबद्ध आणि तत्पर कार्यशैलीमुळे देशभर सोशल मीडियावर चर्चेचा विषय बनले होते. औपचारिकपणे आपले पद सोडल्यानंतर, २१ ऑगस्ट रोजी ऋषभ सिंह यांनी राष्ट्रपती भवनात राष्ट्रपतींची भेट घेतली. या भेटीची फोटो सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाले असून, राष्ट्रपती भवनाच्या अधिकृत डिजिटल फोटो लायब्ररीमध्ये त्यांचा माजी एडीसी म्हणून उल्लेख करण्यात आला आहे. त्यांनी या भेटीचे व्हिडिओ आणि फोटो पोस्ट करत, राष्ट्रपतींच्या मार्गदर्शनाबद्दल आणि आशीर्वादाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

### आता मूळ पैठणीवर येणार बारकोड; फसवणूक टाळण्यासाठी उपाय

पंढरपूरः मूळ म्हणजे ओरिजनल पैठणी म्हणत, सेमी पैठणी आणि डुप्लीकेट पैठणी बाजारात विकली जाते. मात्र, आता याच सेमी पैठणी आणि ओरिजनल पैठणीतील फरक स्पष्ट होणार आहे. राज्याच्या वस्त्रोद्योग मंत्रालयाने त्यासाठी शक्कल लढवली असून ग्राहकांची होणारी फसवणूक टळणार आहे. राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांनी याबाबत माहिती दिली आहे. यामुळे, पैठणी खरेदी करणाऱ्या ग्राहकांची फसवणूक होणार नाही. पंढरपूर येथे विठ्ठल दर्शनासाठी आले असता सावकारे यांनी सांगितले की, खऱ्या पैठणीची ओळख होण्यासाठी बारकोडच्या माध्यमातून कोणता धागा वापरलाय, कोणत्या गावात कोणत्या कारागिरांनी ही पैठणी तयार केली याची संपूर्ण माहिती ग्राहकांना उपलब्ध होणार आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.२९ ऑगस्ट २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २६.०० क्विंटल | २,५१० | २,८६० | २,६७१ |
| ज्वारी/हायब्रिड: ९०.०० क्विंटल | २,४०१ | ४,२५५ | ३,३६६ |
| मका/लोकल: ८.०० क्विंटल | २,४५३ | २,४५६ | २,४५४ |
| तूर :०.५० क्विंटल | ६,५०० | ६,५०० | ६,५०० |
| उडीद : २.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: ६४.५० क्विंटल | २,४४० | ३,१६१ | २,८३१ |
| मुग: ६.०० क्विंटल | ८,९०० | ९,२२५ | ९,०६२ |
| सोयाबीन: १९.५० क्विंटल | ५,९०० | ५,९०० | ५,९०० |
| हरभरा: २.०० क्विंटल | ४,९०४ | ६,००० | ५,४३५ |

# सुप्रीम कोर्टाचा निकाल आधीच सेट केलाय का?

## संजय राऊतांचा अमित शहांवर थेट निशाणा



मुंबई I प्रतिनिधी

शनिवारी सह्याद्री विश्रामगृहावर राज्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी गृहमंत्र्यांची भेट घेतली. साहेब, आमचे आमदार आणि मंत्री फार घाबरले अन् अस्वस्थ आहेत; सुप्रीम कोर्टाचा निकाल काय लागेल याबाबत आमच्या मंत्र्यांच्या आणि आमदारांच्या मनामध्ये अस्वस्थता असल्याचे त्यांनी सांगितले. त्यावर त्यांच्या साहेबांनी मी सर्व पाहून घेईन, असे आश्वासन दिले आहे. आता त्यांनी सर्वोच्च न्यायालयात निकाल आधीच सेट केला आहे का?'' असा सवाल करत शिवसेना (ठाकरे गट) खासदार संजय राऊत यांनी रविवारी (दि.३०) माध्यमांशी बोलताना केंद्रीय गृहमंत्री अमित शहांवर निशाणा साधला.

यावेळी संजय राऊत म्हणाले की, ''गेल्या महिन्यात संसदेचे अधिवेशन सुरू असताना सत्ताधारी गटाच्या खासदारांनी अमित शहा यांची भेट घेऊन न्यायालयाच्या संभाव्य निकालाबाबत चिंता व्यक्त केली होती. त्यावर अमित शहा यांनी सब सेट हो जाएगा, उसकी चिंता मत करो, मेरे पे छोडो असे आश्वासन दिल्याचे समोर आले आहे. तसेच, शनिवारी मुंबईत अमित शहा आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट झाली. या भेटीत शिंदे यांनी आपले मंत्री व आमदार अस्वस्थ आणि घाबरलेले आहेत असे सांगितल्यावर, शहा यांनी पुन्हा मेरी पार्टी है, मेरी चिंता है, सब सेट हो गया है असे विधान केल्याचा दावाही राऊतांनी केला. राहुल नार्वेकर, देवेंद्र फडणवीस आणि पान २ वर

# एकनाथ शिंदेंच्या भाषणावेळी मराठा आंदोलक आक्रमक

## काळे झेंडे अन् जोरदार घोषणाबाजी; अनेकजण ताब्यात



परभणी I प्रतिनिधी

**परभणीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सभेदरम्यान मराठा आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी करत काळे झेंडे दाखवून निषेध व्यक्त केला. पन्नासहून अधिक आंदोलकांना पोलिसांनी ताब्यात घेतले.**

परभणी शहरातील इंदिरा गांधी स्टेडीयम मैदानावर रविवार, दि. ३० ऑगस्ट रोजी शेतकरी व युवा संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याला रविवार सकाळपासून जरांगे पाटील यांनी विरोध केला होता. मात्र आयोजक खा.बंडू जाधव यांनी कार्यक्रम पुर्वनियोजीत असल्याचे कारण देत कार्यक्रम रद्द करण्यास नकार दिला. दरम्यान, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या भाषणादरम्यान मराठा आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी केली. सभेच्या ठिकाणाबाहेर मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांनी आंदोलन करत सरकारविरोधात घोषणाबाजी केली. घोषणाबाजी करणाऱ्या आंदोलक पान २ वर

### महायुती सरकार बळीराजाच्या पाठीशी – एकनाथ शिंदे

परभणीः संपूर्ण महाराष्ट्रात पावसाने ताण दिला आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी पिके करपण्याच्या अवस्थेत आहेत. या परिस्थितीमुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. अशा बिकट परिस्थितीत शेतकऱ्यांना वाऱ्यावर न सोडता महायुती सरकार खंबीरपणे शेतकऱ्यांच्या पाठीशी उभा असल्याची ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी परभणीतील शेतकरी व युवा संवाद मेळाव्यात बोलताना दिली. शेतकरी व युवा संवाद मेळाव्याला असलेली गर्दी जमवलेली किंवा भाड्याची नसून मनापासून उपस्थित असलेल्या लाडक्या बहिणी, भाऊ व शेतकऱ्यांची गर्दी आहे. महायुती सरकारने प्रत्येकाच्या नावापुढे आईचे नाव लिहीण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला. केंद्राप्रमाणे राज्याने शेतकऱ्यांना ६ हजार देण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. कर्जमाफी योजनेचा १२ शेतकऱ्यांना लाभ मिळाला आहे. शेतकरी व युवकांच्या हिताच्या योजना प्राधान्याने सुरू राहतील. महायुती सरकार सदैव शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय घेणारे असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

# राज्यात हलक्या पावसाची शक्यता

पुणे I प्रतिनिधी

महाराष्ट्रावर सोमवारी (दि.३१) १०००६ हेप्टापास्कल हवेचा दाब राहील. त्यामुळे सर्वच जिल्ह्यांत हलक्या पावसाची शक्यता राहील. मात्र मंगळवार (दि.१) ते शनिवार (दि. ५) या काळात महाराष्ट्रावर १००८ हेप्टापास्कल इतका हवेचा दाब वाढेल. त्यामुळे तुरळक ठिकाणी अत्यंत हलक्या पावसाची शक्यता राहील. तसेच पावसात बराच काळ उघडीप आणि सूर्यप्रकाश जाणवणे शक्य आहे. त्यामुळे बाष्पीभवनाचा वेग वाढेल. पिकांची पाण्याची गरज वाढेल.

या काळात हवामान अंशतः ढगाळ राहील. सर्वच जिल्ह्यांत वाऱ्याची दिशा नैऋत्येकडून राहील. या आठवड्यात वाऱ्याच्या ताशी वेगात वाढ होईल. उत्तर महाराष्ट्रातील नाशिक, धुळे, जळगाव जिल्ह्यात वाऱ्याचा ताशी वेग १७ ते १९ कि.मी. राहील. पश्चिम विदर्भातील सर्वच पान २ वर

# राज्य लोकतंत्र च्या लातूर जिल्हा कार्यालयात आवृत्ती शुभारंभ आढावा

लातूर I प्रतिनिधी

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून १७ सप्टेंबर २०२६ रोजी विविध मान्यवरांच्या उपस्थितीत दैनिक 'राज्य लोकतंत्र'च्या लातूर आवृत्तीचा शुभारंभ तसेच जिल्हा कार्यालयाचा उद्घाटन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर कार्यालयाच्या ठिकाणी जय्यत तयारी सुरू आहे. दरम्यान, दैनिक 'राज्य लोकतंत्र'चे कार्यकारी संपादक सुभाष चौरे यांनी नव्याने उभारण्यात आलेल्या महात्मा



गांधी चौक येथील मनपा व्यापारी संकुल येथील लातूर आवृत्तीच्या जिल्हा कार्यालयास नुकतीच सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी कार्यालयाची पाहणी पान २ वर

# एमपीएससीच्या अध्यक्ष, सचिवांनी राजीनामा द्यावा-आ.बच्चू कडू

मुंबई I प्रतिनिधी



अन्न व औषध प्रशासनाच्या (एफडीए) औषध निरीक्षक परीक्षेचा पेपर फुटल्याचा प्रकार आणि स्पर्धा परीक्षांशी संबंधित अनेक वादग्रस्त घटनांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष आणि सचिवांनी नैतिक आधारावर राजीनामा द्यावा, अशी मागणी शिवसेनेचे आमदार बच्चू कडू यांनी रविवारी केली. दरम्यान, सत्ताधारी पक्षाकडूनच ही मागणी करण्यात आल्याने एमपीएससीच्या अध्यक्षांनी राजीनामा देण्याबाबत दबाव वाढल्याचे बोलले जात आहे.

या वर्षाच्या सुरुवातीला घेण्यात आलेल्या ड्रग इन्स्पेक्टर (गट–ब) परीक्षेचा प्रश्नपत्रिका फुटल्याच्या प्रकरणात पोलिसांनी बुधवारी आयोगाच्या तीन अधिकाऱ्यांसह सहा जणांना अटक केली होती. बच्चू कडू म्हणाले, आयोगाचे अध्यक्ष आणि सदस्य यांचा कोणताही राजकीय संबंध नसावा. तसेच सचिव हे राज्य पान २ वर

# कोचिंग क्लासेसवरील कठोर अटी मागे घ्या!


## राज्यातील क्लासचालकांची मागणी

मुंबई I प्रतिनिधी

खासगी कोचिंग क्लासेससाठी शासनाने प्रस्तावित केलेल्या नियमावलीतील कठोर अटी शिथिल कराव्यात, अशी मागणी राज्यातील कोचिंग क्लासेस चालकांच्या संघटनांनी केली आहे. या नियमावलीच्या मसुद्यावर सूचना व हरकती मागविण्यात आल्या असून, त्यात क्लासचालकांना अडचणीच्या ठरणाऱ्या अनेक तरतुदी असल्याचा दावा संघटनेने केला आहे. या अटी शिथिल केल्यास शासनाला सहकार्य करण्याची तयारी असल्याचे राज्य प्रवक्ते बंडोपंत भुयार यांनी म्हटले आहे.



राज्यातील कोचिंग क्लासेसचे आकारमान आणि विद्यार्थ्यांची संख्या वेगवेगळी असल्याने सर्व क्लासेसना सरसकट समान नियम लागू करू नयेत. लहान, मध्यम आणि मोठे क्लासेस असे वर्गीकरण करून त्यानुसार नियम निश्चित करावेत, अशी मागणी करण्यात आली. शंभरपेक्षा अधिक विद्यार्थी असलेल्या क्लासेससाठीच नोंदणीची अट ठेवावी तसेच नोंदणी वारंवार करण्याऐवजी एकदाच करण्याची सुविधा द्यावी, असेही संघटनेने म्हटले आहे. क्लासमध्ये विद्यार्थ्यांसाठी आवश्यक जागेची अटही शिथिल करण्याची मागणी करण्यात आली आहे. सध्याच्या प्रस्तावित प्रमाणाऐवजी प्रतिविद्यार्थी कमी जागेची अट ठेवावी. तसेच अनुभवी शिक्षकांना पदवीची सक्ती करू नये, अशी भूमिका संघटनेने मांडली. विद्यार्थ्यांनी क्लास सोडल्यानंतर उर्वरित कालावधीची फी आकारू नये आणि फीविषयक नियम व्यवहार्य ठेवावेत, अशी मागणीही करण्यात आली आहे. नियमांचे उल्लंघन झाल्यास थेट मोठा दंड करण्याऐवजी प्रथम सूचना देण्यात यावी. त्यानंतरही नियमभंग झाल्यास टप्प्याटप्प्याने दंडाची तरतूद करावी, अशी मागणी करण्यात आली. क्लासेसची तपासणी करण्यापूर्वी संबंधित संचालकांना पूर्वकल्पना द्यावी, अशी सूचनाही संघटनेने केली आहे. प्रत्येक क्लासमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी रॅम्पसह सर्व सुविधा उपलब्ध करून देणे व्यवहार्य नसल्याचे संघटनेने म्हटले पान २ वर



# नेपाळमधील नैसर्गिक आपत्तीत मृत्युमुखी पडलेल्यांचा आकडा ७८८ वर

काठमांडू I वृत्तसंस्था

नेपाळमध्ये आलेल्या भीषण महापुरानंतर परिस्थिती अत्यंत चिंताजनक झाली आहे. रविवारी (दि. ३० ऑगस्ट) मिळालेल्या माहितीनुसार, पुरानंतर आतापर्यंत तब्बल ७८८ जणांचे मृतदेह हाती आले आहेत. सर्वाधिक २६४ मृत्यू चितवन भागात झाले असून, नवलपरासी ईस्टमध्ये १९४, नवलपरासी वेस्टमध्ये १२०, गोर्खा ५८, नुवाकोट ५२, धाडिंग ५०, तनहुन ३७ आणि रसुवामध्ये १३ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे.

नेपाळच्या नॅशनल डिझास्टर रिस्क रिडक्शन अँड मॅनेजमेंट अथॉरिटीने पान २ वर

अग्रलेख

# अमेरिकेत 'सर्वसमावेशक हिंदुत्व', भारतात 'ध्रुवीकरण' का?

## भागवतांच्या बदललेल्या सुराचा भाजप-आरएसएसने आधी भारतात अर्थ सांगावा!

मोहन भागवत अमेरिकेत गेले आणि अचानक हिंदुत्वाच्या भाषेला मानवतेची किनार आली! 'भारतात मुस्लीम नसावेत असे मानणारा व्यक्ती हिंदूच नाही', भारताच्या डीएनएमध्ये विविधता आहे, धर्मांचे मार्ग वेगवेगळे असले तरी मानवता एक आहेअशी भूमिका राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या सरसंघचालकांनी न्यूयॉर्कच्या व्यासपीठावर मांडली. हे ऐकायला निश्चितच सुखद आहे. पण प्रश्न एवढाच आहे, हे मोहन भागवत भारतात कुठे होते? अमेरिकेच्या भूमीवर सर्वसमावेशक हिंदुत्वाची भाषा आणि भारतात त्याच हिंदुत्वाच्या नावाने होणारे राजकीय ध्रुवीकरण, हा विरोधाभास आता लपून राहिलेला नाही. परदेशात भारताची प्रतिमा उदार, सहिष्णू, बहुविध आणि मानवतावादी दाखवायची आणि देशात धर्मांच्या आधारावर मतांचे राजकारण करायचे, ही दुहेरी रणनीती किती दिवस चालणार?

भागवतांचे अमेरिकेतील वक्तव्य ऐकून देशातील प्रत्येक सुजाण नागरिकाने आनंद व्यक्त करावा. पण त्याच वेळी एक आरसा त्यांच्या समोर धरायला हवा. कारण अमेरिकेतील मॅडिसन स्क्वेअर गार्डनमध्ये 'मुस्लीम नसावेत असे मानणारा हिंदूच नाही' असे सांगणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच ते भारतातील प्रत्येक राजकीय व्यासपीठावर सांगणे अधिक महत्त्वाचे आहे. न्यूयॉर्कच्या स्टेजवर सांगितलेले सत्य नागपूरच्या स्टेजवरही सांगण्याचे धाडस आहे का? हा प्रश्न केवळ भागवतांना नाही; भाजपलाही आहे. कारण आरएसएस आणि भाजप यांचे परस्पर संबंध भारतीय राजकारणातील उघड गुपित आहेत. भाजप स्वतःला हिंदुत्ववादी राजकीय पक्ष मानतो, तर आरएसएस सांस्कृतिक संघटना म्हणून आपली ओळख सांगतो. मात्र राजकारणात हिंदुत्वाचा मुद्दा तापवला जातो तेव्हा संघ परिवारातील अनेक घटक सक्रिय होतात आणि निवडणूक संपल्यानंतर समावेशकतेची भाषा पुढे येते. ही वेळोवेळी बदलणारी भाषा आता जनतेच्या लक्षात येत नाही, असे समजणे हा राजकीय अहंकार ठरेल. अमेरिकेतील भागवतांचे भाषण याच कारणामुळे महत्त्वाचे आहे. जर हिंदुत्व खरोखरच सर्वसमावेशक असेल, तर त्याला मुस्लीमांविरोधातील द्वेषाची गरज काय? जर भारताच्या संस्कृतीचा पाया विविधतेत असेल, तर धार्मिक अल्पसंख्याकांच्या नागरिकत्वावर संशय घेणारी भाषा का? जर 'मानवता एक' असेल, तर धर्माच्या नावावर नागरिकांना राजकीय शत्रू बनविण्याची गरज काय? आणि जर या प्रश्नांची उत्तरे 'नाही' अशी असतील, तर भागवतांचे अमेरिकेतील वक्तव्य भारतीय राजकारणासाठी एक मोठा आत्मपरीक्षणाचा क्षण ठरायला हवा. परंतु इथेच संशयाची सावली निर्माण होते. आरएसएसच्या शताब्दी वर्षात अमेरिकेतील हा दौरा जागतिक स्तरावर संघाची प्रतिमा आणि पोहोच वाढविण्याच्या प्रयत्नाचा भाग म्हणून पाहिला जात आहे. कार्यक्रमाला ' युनिव्हर्सल ओनेनेस सिलीब्रेशन ' असे नाव देण्यात आले होते आणि संघाच्या जागतिक विस्ताराच्या पार्श्वभूमीवर भारतीय-अमेरिकी समुदायाशी संवाद साधण्याचा उद्देशही अधोरेखित झाला आहे. मग प्रश्न असा, शंभर वर्षांच्या संघप्रवासानंतर जगाला दाखविण्यासाठी एक चेहरा आणि भारतात राजकारणासाठी दुसरा चेहरा, अशी गरज का निर्माण झाली? अमेरिकेत संघावर टीका करणारे आवाजही उठले. न्यूयॉर्कचे महापौर झोहरान ममदानी यांनी या कार्यक्रमाच्या विचारसरणीवर सार्वजनिक आक्षेप घेतला; विविध धार्मिक आणि नागरी संघटनांनीही विरोध केला. या विरोधाचा भागवतांनी संवादाने सामना करणे हे स्वागतार्ह आहे. पण लोकशाहीची खरी कसोटी परदेशात विरोधकांशी संवाद साधण्यात नाही; स्वतःच्या देशातील विरोधकांना, पत्रकारांना, कार्यकर्त्यांना, अल्पसंख्याकांना आणि प्रश्न विचारणाऱ्या नागरिकांना किती सन्मान दिला जातो यात आहे. अमेरिकेत 'संवाद' आणि भारतात 'देशद्रोह'ही दोन मापे चालणार नाहीत. अमेरिकेत 'विविधता' आणि भारतात 'बहुसंख्याकांचे वर्चस्व'ही दोन तत्त्वे एकाच वेळी खरी असू शकत नाहीत. अमेरिकेत 'मानवता' आणि भारतात 'धर्माच्या आधारे राजकीय संशय'या दोन भूमिका एकत्र नांदू शकत नाहीत. याच ठिकाणी भाजपचीही कसोटी आहे. भागवतांच्या वक्तव्याचे स्वागत करण्याचे धाडस भाजप नेतृत्व दाखवणार आहे का? पक्षातील नेते आणि प्रवक्ते भविष्यात मुस्लीम समाजाविषयी त्याच समावेशक भाषेत बोलणार आहेत का? निवडणूक प्रचारात धार्मिक ध्रुवीकरण टाळण्याची हमी देणार आहेत का? सोशल मीडिया आणि राजकीय सभांमध्ये धार्मिक द्वेष पसरविणाऱ्या आपल्या समर्थकांना थांबविणार आहेत का? की अमेरिकेतील भागवतांचे भाषण 'जागतिक प्रतिमा सुधारण्यासाठी' आणि भारतातील राजकारण नेहमीच्या ध्रुवीकरणासाठी? दुहेरी भूमिका असेल तर ती आता उघडी पडली आहे. भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला समान नागरिकत्व दिले आहे. त्यामुळे 'समावेशक हिंदुत्व' ही कल्पना प्रत्यक्षात आणायची असेल, तर तिची सुरुवात संविधानाच्या मूल्यांपासूनच झाली पाहिजे. मुस्लीम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, जैन किंवा कोणत्याही धर्माचा नागरिक हा प्रथम भारतीय नागरिक आहे. त्याच्या देशभक्तीचे प्रमाणपत्र त्याच्या धर्माच्या नावावर देण्याची गरज नाही. भागवतांनी अमेरिकेत हेच सांगितले असेल, तर त्याचे स्वागत. पण आता पुढचा प्रश्न त्यांचाच आहे, हे भारतात कधी सांगणार? देशातील राजकीय वातावरणात धर्माच्या नावावर विष पेरले जात असताना सरसंघचालकांची भूमिका केवळ अमेरिकेच्या व्यासपीठावर ऐकू येऊन चालणार नाही. ती भारताच्या संसदेत, विधानसभा निवडणुकांमध्ये, पक्षांच्या प्रचारसभांमध्ये, सामाजिक माध्यमांवर आणि सामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनातही दिसली पाहिजे. कारण हिंदुत्व खरोखरच 'सर्वसमावेशक' असेल, तर त्याला मुस्लीमविरोधी राजकारणाची बैसाखी लागणार नाही आणि हिंदुत्व खरोखरच 'मानवतेचा संदेश' असेल, तर त्याला मतांच्या ध्रुवीकरणासाठी धर्माची तलवार उचलावी लागणार नाही. मोहन भागवतांनी अमेरिकेत एक चांगला संदेश दिला आहे. आता त्याची खरी परीक्षा भारतात होणार आहे. अमेरिकेत हिंदुत्वाचा चेहरा बदलला असेल, तर भारतात त्याचे राजकारणही बदलेल का? हा प्रश्न आज विरोधकांचा नाही. हा प्रश्न प्रत्येक भारतीय नागरिकाचा आहे. कारण देशाला भाषणातील हिंदुत्व नको आहे; देशाला आचरणातील बंधुता हवी आहे. देशाला अमेरिकेसाठी तयार केलेली समावेशकतेची प्रतिमा नको; भारताच्या मातीत रुजलेली समावेशकता हवी आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे न्यूयॉर्कमध्ये 'मुस्लीमांशिवाय भारताची कल्पना करणारा हिंदूच नाही' असे सांगणारा आवाज जर खरोखर प्रामाणिक असेल, तर तो आवाज भारतातही तितक्याच ताकदीने घुमला पाहिजे. नाहीतर इतिहास एवढेच म्हणेल, परदेशात मानवतेचे भाषण आणि देशात ध्रुवीकरणाचे राजकारण; ही विचारसरणी नव्हे, ही सोयीची राजकीय भाषा आहे.

# जुजगव्हाण लघु प्रकल्पावरील अनधिकृत विद्युत मोटारी काढल्या

## विभागीय आयुक्तांच्या सूचनेनुसार महसूल प्रशासनाची कारवाई; पुन्हा मोटारी टाकल्यास कायदेशीर कारवाईचा इशारा

**बीड । प्रतिनिधी**

**पावसाने ओढ दिल्याने उपलब्ध जलसाठ्याचे काटेकोर नियोजन करण्याची गरज निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर बीड तालुक्यातील जुजगव्हाण येथील लघु प्रकल्पातून अनधिकृतपणे पाणी उपसा करणाऱ्या विद्युत मोटारी महसूल प्रशासनाने काढून घेतल्या. महसूल, पाटबंधारे आणि विद्युत विभागाच्या समन्वयातून ही कारवाई करण्यात आली. जुजगव्हाण लघु प्रकल्पातील पाण्याचा अनधिकृत उपसा करण्यासाठी विद्युत मोटारी सुरू असल्याची माहिती प्रशासनाला मिळाली होती. त्यानंतर संबंधित विभागाच्या पथकाने प्रकल्पाची प्रत्यक्ष पाहणी केली. पाहणीदरम्यान तलावातून पाणी उपसा करणाऱ्या विद्युत मोटारी आढळून आल्याने त्या तातडीने काढून घेण्यात आल्या.**

पावसाने अपेक्षित ओढ दिल्याने उपलब्ध जलसाठ्यावर आगामी काळात अतिरिक्त ताण येण्याची शक्यता आहे. त्यामुळे तलाव, लघु प्रकल्प आणि इतर जलसाठ्यांमधील पाण्याचा अनधिकृत उपसा रोखण्यावर प्रशासनाने भर दिला आहे. उपलब्ध पाणी केवळ सध्याच्या गरजांसाठीच नव्हे, तर आगामी काळातील पिण्याचे पाणी, शेती आणि जनावरांच्या पाण्याची गरज लक्षात घेऊन जपणे आवश्यक आहे. ''पावसाने ओढ दिल्यामुळे उपलब्ध जलसाठा जपणे अत्यंत आवश्यक आहे. तलावातून अनधिकृतपणे पाणी उपसा करण्यासाठी पुन्हा विद्युत मोटारी टाकल्यास संबंधितांवर नियमानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल. बीड तालुक्यातील इतर जलसाठ्यांवरही पाहणी करून अनधिकृत पाणी उपसा आढळल्यास कारवाई केली जाईल,'' असा इशारा तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी दिला. विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी उपलब्ध जलसाठ्याचे संवर्धन करण्यासाठी



प्रशासनाला आवश्यक सूचना दिल्या आहेत. महसूल, जलसंपदा आणि विद्युत विभागाने समन्वयाने कार्यवाही करून तलावांमधून होणारा अनधिकृत पाणी उपसा रोखावा, असे निर्देश देण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनीही पाण्याचा अनधिकृत उपसा किंवा अपव्यय आढळल्यास संबंधित विभागांनी तातडीने दखल घेऊन नियमानुसार कारवाई करण्याचे आवाहन केले आहे. अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी जलसाठ्याची सद्यस्थिती, पाण्याची आवक आणि वापर याचा नियमित आढावा घेऊन संभाव्य पाणीटंचाई टाळण्यासाठी पूर्वनियोजन करण्याची गरज व्यक्त केली. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी जलसाठ्यांवरील अनधिकृत पाणी उपशावर स्थानिक पातळीवर नियमित लक्ष ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत. तलावातून पाणी उपसा करण्यासाठी मोटारी बसविणे, पाइपलाइन टाकणे किंवा अन्य कोणत्याही माध्यमातून नियमबाह्य पाणी वापर होत असल्यास त्याची तातडीने नोंद घेऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली जलसाठ्यांच्या स्थितीचा आढावा घेऊन आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येत आहेत. जुजगव्हाण येथील कारवाईनंतर तालुक्यातील इतर लघु प्रकल्प, तलाव आणि जलसाठ्यांमधून होणाऱ्या अनधिकृत पाणी उपशावरही प्रशासनाकडून लक्ष ठेवले जाणार आहे. कारवाईवेळी मंडळाधिकारी पुरुषोत्तम आंधळे, ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) जावेद शेख, पाटबंधारे विभागाचे कालवा निरीक्षक श्री. कोरडे आणि महावितरण विभागाचे श्री. कदम उपस्थित होते. तसेच गावचे सरपंच रवी गंगावणे, उपसरपंच श्रीराम सुरवसे, ग्रामपंचायत कर्मचारी, पोलीस पाटील यांच्यासह दत्ता जाधव, मुगाजी मुळे, रामप्रसाद सुरवसे, बंडू थापडे, बळीराम सुरवसे, गोकुळ सुरवसे, संजय देवकते, हरीश सुरवसे आणि विशाल सुरवसे उपस्थित होते. पावसाने ओढ दिलेल्या काळात उपलब्ध जलसाठ्याचे संवर्धन करणे ही प्रशासनासोबतच नागरिकांचीही जबाबदारी आहे. पाण्याचा अनधिकृत उपसा रोखण्याबरोबरच पाण्याचा अपव्यय टाळणे, शेतीसाठी उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर करणे आणि भविष्यातील पाणीटंचाई लक्षात घेऊन नियोजन करणे आवश्यक आहे. ''पाणी जपा; जलसाठे जपा. आजचा जपलेला प्रत्येक थेंब उद्याच्या पाणीटंचाईवर मात करण्याची ताकद देईल. त्यामुळे अनधिकृत पाणी उपसा टाळा, जलसाठे जपा आणि प्रशासनाला सहकार्य करा,'' असे आवाहन तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी केले आहे.

# महाआरोग्य शिबिरातून गरजूंच्या उपचारांना आधार मोफत बायपाससह ८७ हजारांची बिलात सवलत

## गोरगरिबांच्या आजारांचे मोफत निदान; आ.सुरेश आण्णा धस यांच्या आरोग्यसेवा उपक्रमातून मिळतोय जगण्याचा आशेचा किरण

**आष्टी । प्रतिनिधी**

**राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त लोकनेते आमदार सुरेश आण्णा धस यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या महाआरोग्य शिबिराचा गोरगरीब व गरजू रुग्णांना मोठा आधार मिळत आहे. या उपक्रमातून गंभीर आजारांचे निदान, मोफत उपचार, शस्त्रक्रिया तसेच वैद्यकीय खर्चात सवलत मिळत असल्याने अनेक कुटुंबांना दिलासा मिळत आहे.**

सोलापूरवाडी (ता. आष्टी) येथील भाऊसाहेब बापू वायाळ यांच्यावर हृदयविकाराची बायपास शस्त्रक्रिया साईदीप हॉस्पिटल, अहिल्यानगर येथे मोफत करण्यात आली. गावचे सरपंच मनोज थोरवे यांनी रुग्णाची माहिती दिल्यानंतर संबंधित रुग्णालयातील डॉक्टर व कर्मचाऱ्यांशी समन्वय साधून उपचाराची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. त्यानंतर वायाळ यांच्यावर यशस्वीपणे बायपास शस्त्रक्रिया करण्यात आली. दरम्यान, सालेवडगाव येथील अक्षय जपकर यांच्या बहिणी श्रीमती निकिता अंबादास मांढरे (रा. चिंचोडी पाटील) यांच्यावर दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू होते. उपचाराचे बिल मोठे असल्याने आर्थिक अडचण निर्माण झाली होती. याप्रकरणी सालेवडगावचे सरपंच अशोक दहातोंडे यांनी आमदार सुरेश धस यांच्याकडे पाठपुरावा केला. त्यांच्या पत्राच्या माध्यमातून रुग्णालयाच्या बिलात तब्बल ८७ हजार रुपयांची सवलत मिळवून देण्यात आली. त्यानंतर रात्री ११ वाजता रुग्णाला डिस्चार्ज देण्यात आला.

# 'भारतात मुस्लिम नकोत म्हणणारा हिंदू असूच शकत नाही'

## न्यूयॉर्कमधील कार्यक्रमात सरसंघचालक मोहन भागवत यांचे विधान

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**हिंदू धर्म संपूर्ण मानवतेच्या एकतेवर विश्वास ठेवतो; त्यामुळे ''जर कोणत्याही हिंदूला वाटत असेल की भारतात मुस्लिम नसावेत, तर तो व्यक्ती हिंदूच नाही,'' असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी केले.**



शनिवारी न्यूयॉर्क येथे आयोजित 'वन वर्ल्ड वन ह्युमॅनिटी' या विशेष कार्यक्रमात ते बोलत होते. ''विविध धर्मांचे मार्ग वेगवेगळे असू शकतात, परंतु सत्य आणि मानवता एकच आहे,'' असे सांगत भागवत पुढे म्हणाले, ''आम्ही अशा समाजातून येतो जिथे संपूर्ण मानवता एक मानली जाते. जर तुम्ही स्वतःला हिंदू म्हणवून घेत असाल, तर सर्व मार्ग एकाच ईश्वराकडे जातात आणि प्रत्येक माणसाचा सन्मान केला पाहिजे यावर तुमचा विश्वास असला पाहिजे. मानवा-मानवांमध्ये कोणताही भेद असू शकत नाही.'' विविधतेचे रक्षण करणे हा निसर्गाचा नियम असून एकता हेच अंतिम सत्य आहे, असे त्यांनी सांगितले. ''मी धर्मशास्त्रज्ञ किंवा धार्मिक अधिकारी नाही. पण मी अशा समाजात कार्य करतो जो पारंपरिकदृष्ट्या हेच मानतो की धर्म भिन्न असले तरी मानवता एकच आहे,'' असेही त्यांनी स्पष्ट केले. अमेरिकेतील 'प्लुरॅलिझम' आणि भारतातील 'विविधतेतील एकता' यांची तुलना करताना सरसंघचालक म्हणाले, ''अमेरिकेचा उल्लेख होतो तेव्हा 'बहुलतावाद' या शब्दाची चर्चा होते, तर भारताचा उल्लेख होतो तेव्हा 'विविधतेतील एकता' या संकल्पनेवर भर दिला जातो. भारतासाठी एकता आणि विविधता या दोन्ही गोष्टी त्याच्या डीएनएमध्येच सामावलेल्या आहेत.'' अमेरिकन हिंदूज फॉर एंगेजमेंट अँड डायलॉग या संस्थेने 'रक्षाबंधन' निमित्त या विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते. ''हे जग एक कुटुंब आहे (वसुधैव कुटुंबकम्) हाच या कार्यक्रमाचा सार्वकालिक संदेश आहे. मानवनिर्मित भेदभाव आणि मतभेद विसरून प्रत्येकाने परस्पर आदर आणि एकतेची भावना जपावी,'' असे आयोजकांनी सांगितले.

पान १ वरून...

### ऑनलाइनच्या कटकटीत

आवश्यक करण्यात आले आहे. अनेक शेतकऱ्यांना ऑनलाइन अर्ज भरण्याची प्रक्रिया माहिती नसल्याने त्यांना महा ई-सेवा केंद्राची मदत घ्यावी लागते. त्यासाठी अर्जाच्या कामासह विविध स्वरूपाचा खर्च करावा लागत असून, काही शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार साधारण १०० रुपयांपर्यंत अतिरिक्त खर्च येत आहे. 'ऑनलाइन'च्या नावाखाली शेतकऱ्यांचा त्रास वाढत असेल, तर या प्रक्रियेचा फेरआढावा घेण्याची वेळ आली आहे. शेतकऱ्यांना सुविधा देण्यासाठी सुरू केलेली यंत्रणा त्यांच्यासाठीच डोकेदुखी ठरू नये, यासाठी भूमी अभिलेख विभागाने प्रलंबित अर्जांचा तातडीने निपटारा करून मोजणी प्रक्रिया पारदर्शक, वेळेत आणि अचूक करण्याची गरज आहे.

-------------

### एकनाथ शिंदेंच्या भाषणावेळी मराठा

कार्यकर्त्यांनी पोलिसांनी ताब्यात घेतले. पन्नासहून अधिक मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतल्याची माहिती आहे. त्यामुळे सभेच्या ठिकाणी काही वेळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान एकणाथ शिंदे यांच्या भाषणाला सुरुवात होताच काही आंदोलक कार्यकर्त्यांनी काळे झेंडे दाखवत निषेध व्यक्त केला. अचानक काळे झेंडे दाखवण्यात आल्याने सभेच्या ठिकाणी पोलिसांची धावपळ झाली. या घटनेनंतर एकनाथ शिंदे यांनी पोलिसांना विनंती करत काळे झेंडे दाखवणाऱ्या कार्यकर्त्यांना स्टेजवर आणा, अशा सूचना दिल्या. त्यामुळे सभास्थळी काही काळ या घटनेची चर्चा रंगली. मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून आंदोलकांनी पुन्हा एकदा आक्रमक भूमिका घेतल्याचे या घटनेतून दिसून आले. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी सभेच्या ठिकाणी सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली. एकीकडे आंतरवालीसराटीमध्ये मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण सुरू असतानाच एकनाथ शिंदे यांची सभा असल्याने मनोज जरांगे यांनी खासदार संजय जाधव यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला होता. तसेच कार्यक्रम रद्द करण्याची मागणी केली होती. मात्र हा कार्यक्रम दोन महीनेआधीच निश्चित झाला असल्याने रद्द करणे अशक्य असल्याचे त्यांनी सांगितले. यावरूनच सभा स्थळी एकनाथ शिंदे यांच्या भाषणादरम्यान मराठा आंदोलक हे आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. दरम्यान, मेळाव्याची तारीख २ महिन्यांपूर्वी निश्चित करण्यात आली होती. विशेष म्हणजे हा मेळावा शेतकरी व युवकांच्या विकासासाठी आयोजित केला होता. मेळावा रद्द झाला असता तर दुरवरून आलेल्या शेतकरी व युवकांना त्रास झाला असता. आपण कोणत्याही सामाजिक कार्यकर्त्यांच्या विरोधात नसल्याचे सांगत विकासाच्या लढ्यात सर्वांच्या सोबत असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी केले.

-------------

### सुप्रीम कोर्टाचा निकाल

एकनाथ शिंदे हे सर्वजण आधीच एकाच सुरात निकालाबाबत वक्तव्ये करत असल्याचेही त्यांनी सांगितले.'' ''न्यायव्यवस्थेवर आमचा पूर्ण विश्वास असून अधर्माच्या बाजूने सर्वोच्च न्यायालय जाणार नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांच्या आसनामागे 'यतो धर्मस्ततो जयः' (जिथे धर्म आहे तिथे विजय आहे) हे बोधवाक्य लिहिलेले आहे. त्यामुळे सत्ताधाऱ्यांचा पाय कितीही खोलात गेला तरी शेवटी सत्याचाच विजय होईल,'' असा विश्वासही संजय राऊत यांनी व्यक्त केला. दरम्यान, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी न्यू यॉर्कमध्ये जाऊन ''मुसलमानांचा द्वेष करणारा हिंदू असू शकत नाही'' असे विधान केले. या विधानाचा समाचार घेताना, ''भागवतांनी हे विधान अमेरिकेत न करता भारतात, दिल्लीत आणि नागपुरात करायला हवे,'' असे सांगत ''भारतात विद्वेषाचे राजकारण करणाऱ्यांच्या पाठीशी संघ उभा राहणार नाही आणि संघस्वयंसेवक सरकारमध्ये असले तरी त्यांना सत्तेतून बाहेर काढू, अशी स्पष्ट भूमिका भागवतांनी भारतात घेऊन दाखवावी. हिंदू धर्मात ढोंगाला स्थान नाही, त्यामुळे सरसंघचालकांनी भारतात एक आणि परदेशात दुसरे अशी दुटप्पेपणाची भूमिका घेऊ नये,'' असेही राऊत म्हणाले.

---------------

### एमपीएससीच्या अध्यक्ष, सचिवांनी

सचिवालयातील (मंत्रालय) कॅडरमधील अधिकारी नसून वरिष्ठ आयएएस अधिकारी असावेत. कडू यांनी आयोगाच्या सध्याच्या सह-सचिव आणि परीक्षा नियंत्रक यांच्या नियुक्तीची सविस्तर चौकशी करण्याची मागणीही केली. आयोगाच्या मंजुरीशिवाय मंत्रालय केडरमधील अधिकाऱ्यांची प्रतिनियुक्तीवर नेमणूक करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. परीक्षा नियंत्रकावरही फौजदारी गुन्हा दाखल केला पाहिजे. कारण परीक्षा प्रक्रियेची, विशेषतः प्रश्नपत्रिकांची सुरक्षा आणि गोपनीयता राखण्याची प्राथमिक जबाबदारी याच पदावर असते, असे कडू म्हणाले. तसेच, विद्यार्थ्यांच्या हितासाठी आपण रस्त्यावर उतरू, असा इशाराही त्यांनी दिला.

-------------

### दैनिक 'राज्य लोकतंत्र'च्या लातूर कार्यालया

करून प्रकाशन सोहळ्याच्या नियोजनाचा सविस्तर आढावा घेतला. आवृत्ती प्रमुख विनोद उगीले व तालुका प्रतिनिधी, वार्ताहर व लातूर आवृत्तीच्या माध्यमातून जिल्ह्यातील विविध सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, कृषी तसेच स्थानिक प्रश्नांना प्रभावीपणे वाचा फोडण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. कार्यकारी संपादक सुभाष चौरे यांचे कार्यालयात उपस्थित आवृत्ती प्रमुख विनोद उगीले व कार्यालयीन कर्मचारी, पदाधिकारी, तालुका प्रतिनिधी व वार्ताहरांच्या वतीने उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. यावेळी लातूर जिल्ह्यातील तालुका प्रतिनिधी व वार्ताहर मोठ्या संख्येने उपस्थित होते. आगामी प्रकाशन सोहळा यशस्वी करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. यावेळी सुनिल तांदळे, बशीदखा पठाण, माहेताब शेख, भगवान कांबळे आशिष शिंदे संगम डोंगरे श्याम पाठक, सुरवसे आदी प्रतिनिधीची प्रमुख उपस्थिती होती.

-------------

### राज्यात हलक्या

जिल्ह्यांत वाऱ्याचा ताशी वेग १८ ते २१ कि.मी. राहील. मध्य विदर्भातील सर्वच जिल्ह्यांत वाऱ्याचा ताशी वेग ताशी १६ ते २० कि.मी. राहील. पूर्व विदर्भातील सर्वच जिल्ह्यांत वाऱ्याचा ताशी वेग चंद्रपूर जिल्ह्यात ताशी १८ कि.मी. तर उर्वरित जिल्ह्यात तो ८ ते १२ कि.मी. राहील. बहुतांशी जिल्ह्यात सूर्यप्रकाश अधूनमधून प्रखर राहील. ठाणे व पालघर जिल्ह्यांत प्रतिदिनी ५ ते ७ मि.मी. पावसाची शक्यता असून सिंधुदुर्ग व रायगड जिल्ह्यात १० मि.मी. आणि रत्नागिरी जिल्ह्यात १४ मि.मी. पावसाची शक्यता आहे. नांदेड, जालना, धाराशिव व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यांत प्रतिदिनी २ मि.मी. पावसाची शक्यता आहे. बीड व परभणी जिल्ह्यांत प्रतिदिनी ३ मि.मी. पावसाची शक्यता आहे. तसेच लातूर व हिंगोली जिल्ह्यात प्रतिदिनी ५ मि.मी. पावसाची शक्यता आहे. त्यामुळे बराच काळ पावसात उघडीप राहणेही शक्य आहे.

---------------

### नेपाळमधील नैसर्गिक आपत्तीत

दिलेल्या माहितीनुसार, २५०२ नागरिक अद्याप बेपत्ता असून, बाधित भागात वेगाने बचावमोहीम राबवली जात आहे. ओळख पटू न शकलेले मृतदेह देशभरातील २१ रुग्णालयांमध्ये ठेवण्यात आले आहेत. बेपत्ता नागरिकांमध्ये स्थानिक जलविद्युत प्रकल्पातील ९३३ कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. याशिवाय ५९२ परदेशी नागरिक आणि परदेशी पर्यटकांसोबत प्रवास करणारे १२७ नेपाळी नागरिकही गायब आहेत. बेपत्ता झालेल्यांच्या यादीत नेपाळ पोलीस, नेपाळ सैन्य, सशस्त्र पोलीस दल, सीमाशुल्क आणि इमिग्रेशन कार्यालयातील कर्मचाऱ्यांचाही समावेश आहे. या दुर्घटनेतील २३९ जखमींवर उपचार सुरू असून, आपत्तीग्रस्त भागात सहा सर्जिकल वैद्यकीय पथके तैनात करण्यात आली आहेत. दुसरीकडे, त्रिशूली ३ हायड्रोपावर प्रोजेक्टच्या बोगद्यात अडकलेल्या मजुरांच्या कुटुंबीयांमध्येही प्रचंड चिंतेचे आणि भीतीचे वातावरण आहे.

-------------

### कोचिंग क्लासेसवरील कठोर

आहे. ज्या क्लासमध्ये अशा विद्यार्थ्यांना सुविधा उपलब्ध आहेत, तेथे त्यांनी प्रवेश घेण्याची मुभा असावी, मानसोपचारतज्ज्ञ व समुपदेशकांच्या भेटीबाबत नियम व्यवहार्य करण्याची मागणी करण्यात आली आहे. नोंदणीकृत कोचिंग क्लासेसच्या संचालकांना शिक्षक मतदारसंघात मतदानाचा अधिकार द्यावा. तसेच अनुभवी व पात्र शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यात यावा आणि अनुभवी क्लासचालकांना राज्य अभ्यास मंडळाच्या सदस्यपदी संधी द्यावी, अशा मागण्याही करण्यात आल्या आहेत.

-------------


## थोडक्यात

### हिवरापहाडी शाळेत राष्ट्रीय क्रिडा दिन उत्साहात साजरा

बीड । प्रतिनिधी




बीड तालुक्यातील आदर्श शाळां म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जि प प्राथमिक शाळा हिवरापहडी येथे वि २९ रोजी हॉकि खेळाचे जादुगार मेजर ध्यानचंद यांची जयंती साजरी करून किडा विभागाच्या वतीने राष्ट्रीय किडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला बीड तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हिवरापहडी येथे जिल्हा परिषद चे मुख्य कार्यकारी अधिकारी जतिन रहेमान शिक्षण अधिकारी जयश्री चव्हाण गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती बीड प्रनिती गंगाखेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली हॉकि खेळाचे जादुगार मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात स्वागत गिताने करण्यात आली कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक डी बी डोळस हे होते कार्यक्रमाचे प्रास्ताविक के सी चव्हाण यांनी केले क्रिडा विभाग प्रमुख हारीदास ठोंबरे यांनी हॉकि खेळाचे जादुगार मेजर ध्यानचंद यांचा परीचय करून देत मानविजिवनात खेळाचे महत्त्व देऊन प्रत्येक विद्यार्थीयानी खेळात करीयर केले पाहिजे असे सांगितले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राठोड सर यांनी केले कार्यक्रमाचे आभार रायचंद कदंम यांनी केले या कार्यक्रमाला माथेसुळ मॅडम गेठे मॅडम चव्हाण मॅडम सह सर्व शिक्षक विद्यार्थी पालक व गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने हजर होते राष्ट्रिय क्रिडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.



### पोलिस पाटील संघटनेचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब शिंदे यांची माजलगाव येथे औपचारिक भेट

माजलगांव । प्रतिनिधी

माजलगांव येथे पोलिस पाटील संघटना, महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष मा. बाळासाहेब शिंदे यांची रविवार, दि. ३० ऑगस्ट रोजी औपचारिक भेट झाली. यावेळी रयत प्रतिष्ठानच्या वतीने बाळासाहेब शिंदे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

या भेटीदरम्यान सामाजिक कार्य, ग्रामीण भागातील विविध समस्या तसेच पोलिस पाटील संघटनेच्या कार्यासंदर्भात सकारात्मक चर्चा करण्यात आली. ग्रामीण भागातील नागरिकांचे प्रश्न, सामाजिक उपक्रम आणि संघटनेच्या माध्यमातून करण्यात येणाऱ्या विविध कार्यांवरही यावेळी विचारविनिमय झाला. यावेळी आमदार अमित गोरखे युथ फाउंडेशन, वडवणीचे दशरथ भाऊ कुचेकर, विशाल भाऊ गवळी, समाधान भाऊ मुजमुले, रयत प्रतिष्ठानचे सचिव अनिल भैय्या ढगे तसेच डॉ. रंजीत कसबे यांची उपस्थिती होती. या औपचारिक भेटीमुळे सामाजिक क्षेत्रात कार्यरत विविध पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये सकारात्मक संवादाला चालना मिळाली.

## सिना -मेहकरी आणि खुंटेफळ प्रकल्पाचे श्रेय अजित दादांना -आ.धस

बीड । प्रतिनिधी

कर्तृत्व,दातृत्व आणि दिमाखदार व्यक्तीमत्व लाभलेले फार कमी नेते महाराष्ट्रात होवून गेले. त्या श्रृंखलेत विलासराव देशमुख, गोपीनाथराव मुंडे यांच्या नंतर अजित दादा पवार यांना महाराष्ट्राने लोकप्रियता बहाल केली. तात्काळ निर्णय घेणे आणि प्रशासनाकडून त्या निर्णयाची अंमलबजावणी करुन घेणे हा दादांचा वादा होता. राजकारणात अनेक वर्ष त्यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याची संधी मिळाली. आष्टी मतदार संघात सिना-मेहकरी प्रकल्प झाल्यामुळे पाच हजार हेक्टर क्षेत्र ओलीताखाली आले आहे. या हरीत क्रांतीचे खरे श्रेय अजित दादांना असल्याचे प्रतिपादन आ.सुरेश अण्णा धस यांनी केले. दादांच्या आठवणी सांगत बसलो तर चार तास सुध्दा कमी पडतील असे ते म्हणाले. पत्रकार संघाने बीड मध्ये सुरु केलेली अजित स्मृती व्याख्यानमाला ही बारा महिन्यासाठी नको तर त्या पुढेही कायम चालू ठेवा.कारण दादांचे व्यक्तीमत्व वर्षानुवर्षे महाराष्ट्रासमोर जिवंत राहिले पाहिजे असे ते म्हणाले.

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने आयोजित अजित स्मृती व्याख्यानमालेचे सातवे पुष्प अर्पण करताना आ.धस बोलत होते. बीडच्या संस्कृती विद्यालयात झालेल्या कार्यक्रमाला जेष्ठ उद्योजक नितीनचंद्र कोटेचा, जेष्ठ विधीज्ञ ॲड.अविनाश गंडले, दै.सकाळचे बीड जिल्हा प्रतिनिधी नितीन चव्हाण,प्राचार्या विजयश्री दराडे आदि मान्यवर उपस्थित होते.महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे आणि बीड जिल्हाध्यक्ष संतोष मानूरकर यांनी मान्यवरांचे स्वागत केले.




### अजित स्मृती व्याख्यानमालेत जागवल्या आठवणी

या प्रसंगी बोलतांना आ.धस म्हणाले की, मी भारतीय जनता पक्षाचा आमदार असताना सुध्दा अजित दादांनी आष्टी तालूक्यासाठी ७ टीएमसी पाणी दिले. विशेष म्हणजे त्या वेळचे जेष्ठ नेते रामराजे निंबाळकर यांचा त्याला विरोध होता. भोसाखिंडी सह सिना-मेहकरीसाठी दादांनी १८ कोटी रु.निधी दिला. ज्यामुळे आज या भागातील पाच हजार हेक्टर क्षेत्र कायमचे ओलीताखाली आले आहे. सन २००४ साली झालेल्या विधानसभा निवडणूकीच्या वेळी दादांनी मी राष्ट्रवादीकडून निवडणूक लढवण्याची इच्छा व्यक्त केली होती.परंतु मी त्यावेळी नम्रपणे निकार दिला. मात्र सिना-मेहकरीचा प्रकल्प पुर्ण व्हावा याच एका उद्देशाने २००५ मध्ये मी भाजपचा आमदार असताना देखील अजितदादांच्या नेतृत्वाखाली काम करायला सुरुवात केली. नंतरच्या काळात दादांनी खुंटेफळ साठवण तलावा सुध्दा मंजुरी दिली. शेतकर्यांनी या तलावासाठी जमिनी द्याव्यात म्हणून बाजार भावापेक्षा सहा पट अधिक भुसंपादन मावेजा अजित दादांमुळेच मंजुर झाला. ज्यामुळे १.६८ टीएमसी पाणी आता या भागाला मिळणार आहे.

अजित दादा हे माझ्या व्यक्तीगत जीवनात सुध्दा जिवाभावाचे मार्गदर्शक होते असेही आ.धस म्हणाले. रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून पिंप्री घुमरी आणि अंमळनेर या माझ्या मतदार संघातील दोन शाळेला दादांनी मदत केली होती.दादांच्या अनेक स्वभावगुणांचे वर्णन यावेळी आ.धस यांनी आपल्या भाषणात केले. दादांच्या अकाली निधनामुळे महाराष्ट्र सुन्न झाला आहे. परंतु आता नियतीपुढे कोणाचे चालत नाही. अशावेळी सुनेत्राताई पवार,पार्थ पवार आणि जय पवार यांना आपण साथ दिली पाहिजे असे आ.धस म्हणाले. या प्रसंगी नितीनचंद्र कोटेचा, ॲड.गंडले, वसंतराव मुंडे, संतोष मानूरकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दत्ता नलावडे यांनी तर सुत्रसंचालन नितीन क्षीरसागर आणि अतुल कुलकर्णी यांनी केले. आभार प्रदर्शन भागवत तावरे यांनी केले. या कार्यक्रमास पत्रकार संघाचे पदाधिकारी श्री.गंगाधरराव देशमुख,प्रतीक कांबळे, दत्ता नलावडे,सुभाष खोगरे, गणेश जाधव, ॲड. भीमराव जगताप,बाजीराव गिरी,शेख तय्यब शब्बीर,उत्तम राठोड सर,बाळासाहेब कळसाने ,महेश गायकवाड ,संदीप फुलझळके ,पवन घाडगे,श्रीराम जाधव,यशवंत म्हेत्रे,पोपट राख,प्रदीप गायकवाड ,विशाल वाघमारे,विश्वनाथ जाधव,महेश इंगोले,प्रा डॉ.आत्माराम झिंजुर्डे,शुभम सारडा, प्रशांत यन्नावर आदि उपस्थित होते.

**अजित दादांच्या पुतळ्याला लाडक्या बहिणीकडून औक्षण**

काल रक्षाबंधनाचा सण होता. महाराष्ट्रातील लाखो महिलांना लाडकी बहिण योजनेचा लाभ मिळवून देणारे अजित दादा पवार यांना काल पत्रकार संघाच्या कार्यक्रमात काही महिलांनी आगळे वेगळे अभिवादन केले. त्यांच्या पुतळ्याला औक्षण करुन राखीचा हार त्यांना घातला.

## भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या अमृत महोत्सवानिमित्त 'अमृत दौड' संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी

भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून श्री सिध्देश्वर शैक्षणिक संकुलाच्या वतीने माजलगाव शहरात ३ किलोमीटर अंतराच्या 'अमृत दौड' (मॅरेथॉन) स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. मौलाना अबुल कलाम आझाद चौक ते छत्रपती संभाजी महाराज चौक या मार्गावर ही स्पर्धा पुरुष व महिला अशा दोन गटांत पार पडली. शहराच्या विविध भागातील धावपटूंनी या स्पर्धेत सहभागी होऊन प्रतिसाद दिला.

भारत माता आणि मेजर ध्यानचंद यांना अभिवादन करून उत्साही वातावरणात पार पडलेल्या या अमृत दौडमध्ये दोन्ही गटांतील विजेत्यांना अनुक्रमे ३००१, २००१, १००१ रुपये रोख, सन्मान



### पुष्कर विष्णू सुरवसे तर मुली मध्ये कु.साक्षी चौधरी प्रथम

चिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. पुरुष गट प्रथम क्रमांक चि.पुष्कर विष्णू सुरवसे,द्वितीय क्रमांक चि. राहुल रामराव सुरवसे,तृतीय क्रमांक चि. आदित्य देवप्रसाद शिंदे,महिला गट प्रथम क्रमांक कु साक्षी बाबासाहेब चौधरी,द्वितीय क्रमांक कु.पुनम विठ्ठल चव्हाण,तृतीय क्रमांक कु.मेहर अशोक शिंदे या प्रसंगी उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक अनंत्रे, माकणे,भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे सहकार्यवाह अमरनाथ खुर्पे, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा श्री सिध्देश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक प्रकाश दुगड, श्री सिध्देश्वर शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासणी, कार्यवाह अड विश्वास जोशी, स्थानिक समन्वय समितीचे सर्व पदाधिकारी, स्थानिक संस्था सभासद, सर्व संस्कार केंद्र प्रमुख प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केंद्रीय सहकार्यवाह अमरनाथ खुर्पे यांनी केले, तसेच मा. अशोक अनंत्रेसाहेब यांनी आपले मनोगत व्यक्त केले. आभार, सुत्रसंचालन क्रिडाध्यापक पंडित मेंडके यांनी केले. ही मॅरेथॉन यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी प्रा उमेश साडेगावकर, पंडित मेंडके यांच्या समितीने अत्यंत नियोजनबद्ध परिश्रम घेतले.

## पान ६ वरून...

पान ६ वरून...

### नदी भूमाफियांच्या विळख्यात

बीड शहराच्या मध्यातून वाहणारी बिंदुसरा ही शहराची नैसर्गिक संपत्ती आहे. तिचे पात्र दिवसेंदिवस कमी होत असताना प्रशासनाने आता गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. नदीपात्रावर अतिक्रमण झाले आहे का, झाले असल्यास ते कोणी केले, त्यावर आतापर्यंत काय कारवाई झाली आणि भविष्यात नदीपात्राचे संरक्षण कसे केले जाणार, या प्रश्नांची उत्तरे प्रशासनाने बीडकरांना देणे आवश्यक आहे. आज बिंदुसरा नदीचे पात्र सुरक्षित ठेवले नाही, तर भविष्यात नदीचा प्रवाह, शहराचे पर्यावरण आणि पावसाळ्यातील सुरक्षितता यावर त्याचा परिणाम होऊ शकतो. त्यामुळे 'बिंदुसरा वाचवा' ही केवळ पर्यावरणाची मागणी नसून बीड शहराच्या भविष्यासाठीची गरज बनली आहे.

### पाटोद्यात 'वैराग्यमूर्ती श्री संत

राहुल राख, लखन सानप पांडुरंग सानप सूरज पाखरे, आदित्य काळूशे, सचिन सानप, गणेश गीते, बालाजी काळूशे, भगवान सानप, आप्पा राख, अशोक गीते, याप्रसंगी उपस्थितांनी संत वामन भाऊ महाराजांच्या पावन स्मृतीस व विचारांस अभिवादन केले. माऊली नगर येथील तरुण मित्र मंडळ व नागरिकांनी एकत्र येऊन राबवलेल्या या स्तुत्य उपक्रमाचे संपूर्ण पाटोदा शहरातून कौतुक होत आहे.

### स्वातंत्र्य सेनानी रामराव

आपल्या नियुक्तीबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना डॉ. शेख अनिसूर रहमान यांनी सांगितले की, संस्थेच्या विश्वासास पात्र राहून महाविद्यालयाचा शैक्षणिक दर्जा उंचावणे, विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण विधी शिक्षण देणे आणि संस्थेची प्रतिष्ठा अधिक वृद्धिंगत करण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन कटिबद्ध राहीन.डॉ. शेख अनिसूर रहमान यांच्या निवडीमुळे महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी मिळून महाविद्यालयामध्ये प्राचार्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या यावेळी महाविद्यालय विकास समिती सदस्य तथा वरिष्ठ प्रा. अँड. के.एस. पंडित , प्रा. अँड एन.एन. साबळे, व सर्व कर्मचारी उपस्थित होते. आजी व माजी विद्यार्थी यांच्यासह बीड जिल्ह्यातील विधी क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### धगधगत्या वडवणीत

सलोखा कायम राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. याप्रसंगी नगससेवक हरिदास टकले,राहुल टकले,सुरेश ढवळशंक, दिगंबर पंधारे,सागर म्हेत्रे,बाबा कुरकुटे, आबा टकले, केशव टकले, माऊली झाडे, शहादेव लोकरे,कृष्णा पंधारे, केशव ढोले, अरुण टकले,सय्यद सलीम, सय्यद सलाउद्दीन, शेख अकबर, जावेद पठाण,रशीद शेख, रौफ शेख, इसाक कुरेशी, सज्जाद कुरेशी, आयुब कुरेशी,अलीम कुरेशी,शेख शरीफ भाई,शहानवाज कुरेशी, शेख राहील, शेख फिरोज, शेख शाहेड,अलाउद्दीन शेख, इम्रान शेख, शेख आबेद सह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### प्रवीण गिरी यांना राज्यस्तरीय

त्यांच्या पत्नी सौ ज्योती गिरी यांना सपत्नीक राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. दशनाम गोसावी समाज परिषदेचे राज्य अध्यक्ष ओमप्रकाश गिरी संस्थापक ड .राजेंद्र बन रवी बन ( प्रसिध्दी प्रमुख) बाजीराव गिरी अवधूत गिरी योगेश गिरी यांच्यासह बीड जिल्ह्यातील अनेक समाज बांधवांच्या पुढाकाराने महाअधिवेशन सोहळा आनंदात संपन्न झाला.राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल प्रवीण गिरी यांच्यावर महाराष्ट्रभरातील समाज बांधव व मित्र परिवाराच्यावतीने अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

### भाजपाचे वडवणी शहराध्यक्ष

देखील त्यांनी योग्य भूमिका निभवली होती. अशाच व्यक्तिमत्त्वाला गेल्या काही दिवसापासून एक आजाराने ग्रासले होते. कठोर इच्छाशक्तीच्या बळावर या व्यक्तिमत्वाने या आजाराला काही प्रमाणात हरवले देखील होते. परंतु प्रकृती उपचाराला साथ देत नसल्याने पुन्हा श्रीमंत तात्या मुंडे यांना पुढील उपचारासाठी एका खाजगी रुग्णालयामध्ये दाखल झाले होते. परंतु नियती देखील प्रकृतीच्या पुढे हातबल झाली. त्यातच परवा गुरुवारी रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास त्यांची अखेर प्राणज्योत मालवली काल सकाळी साडेअकरा वाजता जायच्या सुमारास त्यांच्यावर शोकाकुल वातावरणामध्ये व हजारोच्या जनसमुदायाच्या उपस्थितीत बन्सीधर मुंडे इंग्लिश स्कूलच्या परिसरात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी त्यांच्या पश्चात पत्नी, मुले, मुली, भाऊ, पुतणे, भावजया असा मोठा परिवार आहे. त्यांच्या दुःखात सायं. दैनिक बीड रिपोर्टर देखील सहभागी आहे.

### युवा महोत्सवातून मिळणारी

गणेश चंदनशिवे यांच्या हस्ते युवा महोत्सवाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. नितीन एस. प्रभुतेंडोलकर, डॉ. साईनाथ बनसोडे, प्रा. सुनील मगरे, प्रो.डॉ.भगवानसिंग डोभाळ प्रा. प्रदीप रोडे, किरण गायकवाड, अँड. सुभाष राऊत, आणि दीपा रोडे, जयंत करपे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.प्रास्ताविक करताना तुलसी कॉलेजचे संचालक प्रा. प्रदीप रोडे यांनी युवा महोत्सवाच्या आयोजनामागील भूमिका आणि उद्देश स्पष्ट केला. संस्थेच्या प्राचार्या डॉ. अश्विनी बेद्रे यांनी उपस्थित मान्यवरांचे व सहभागी विद्यार्थिनींचे स्वागत केले. सूत्रसंचालन प्रा.अंकुश कोरडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सांस्कृतिक विभाग प्रमुख तथा महोत्सवाच्या संयोजिका प्रा. विद्या अवघडे यांनी केले.उद्घाटन सोहळ्यानंतर विविध सांस्कृतिक आणि कला प्रकारांच्या स्पर्धांना उत्साहात सुरुवात झाली. दोन दिवसीय या महोत्सवात विविध कला प्रकारांमध्ये विद्यार्थिनी आपली कलात्मकता आणि कौशल्य सादर करणार आहेत. महोत्सवाचा समारोप व पारितोषिक वितरण सोहळा सोमवार, ३१ ऑगस्ट रोजी होणार आहे.

## असोला येथे 'मन की बात' कार्यक्रम उत्साहात संपन्न

वडवणी । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील असोला येथे बूथ क्रमांक ३४५ व ३४६ वर 'मन की बात' कार्यक्रमाचे आयोजन

देशाचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांच्या 'मन की बात' या कार्यक्रमाचे बूथ क्रमांक ३४५ व ३४६ वर उत्साहात आयोजन करण्यात आले. आदरणीय दोन्ही ताईसाहेबांच्या सूचनेनुसार तसेच भाजपा जिल्हाध्यक्षांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी भाजपा जिल्हा सचिव तथा 'मन की बात' जिल्हा संयोजक बालासाहेब चोले, युवा मोर्चा उपाध्यक्ष तथा बूथ प्रमुख राधाकृष्ण चोले यांच्यासह रामधन वावळ, शिवाजी मोरे,



भास्कर चोले, परमेश्वर पांढरपोटे, शिवराम चोले, आप्पा वावळ, गोपीनाथ चोले, अशोक चोले, सुखदेव चोले, बंडू चोले, श्रीकांत बोबडे, सोमनाथ बोबडे, तुकाराम चोले, गणेश चोले, काशिनाथ वावळ, बंडू वावळ, रमेश वावळ, द्रौपदी वावळ, अंकिताबाई वावळ, अलका चोले, उर्मिला चोले, ज्ञानेश्वरी चोले, लक्ष्मीबाई चोले यांच्यासह भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मन की बात' कार्यक्रमाचे श्रवण केले. कार्यक्रमाच्या माध्यमातून विविध सामाजिक, राष्ट्रीय व जनहिताच्या विषयांवर मार्गदर्शन मिळाले. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

## मेजर ध्यानचंद यांच्या कर्तृत्वातून विद्यार्थ्यांना क्रीडाप्रेरणा!
### श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा

**माजलगाव । प्रतिनिधी**

श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयात महान हॉकीपटू व 'हॉकीचे जादूगार' मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना मेजर ध्यानचंद यांच्या प्रेरणादायी जीवनकार्याची आणि भारतीय क्रीडा क्षेत्रातील त्यांच्या अमूल्य योगदानाची माहिती देण्यात आली. क्रीडा क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी विद्यार्थ्यांनी मेहनत, शिस्त, सातत्य आणि संघभावना जोपासावी, असे मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक क्रीडा शिक्षक पंडित मेंडके यांनी मेजर ध्यानचंद यांच्या जीवनातील विविध प्रसंग सांगत विद्यार्थ्यांना क्रीडाक्षेत्रात पुढे येण्याचे आवाहन केले. खेळामुळे शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच आत्मविश्वास, नेतृत्वगुण आणि सकारात्मक दृष्टिकोन विकसित होतो, विद्यार्थ्यांनी खेळाकडे केवळ मनोरंजन म्हणून न पाहता त्यातून शिस्त, आत्मविश्वास, चिकाटी, संघभावना आणि नेतृत्वगुण विकसित करावेत, असे आवाहन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व्यासपीठावर माजी उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर सर,विभागप्रमुख रविंद्र खोडवे, तसेच पर्यवेक्षक सदाशिव ढगे उपस्थित होते. यावेळी विद्यालयातील सर्व शिक्षक-शिक्षिका आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रात प्रगती करण्यासाठी शुभेच्छा दिल्या. मेजर ध्यानचंद यांच्यासारख्या महान खेळाडूंच्या कर्तृत्वातून प्रेरणा घेऊन विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात आपल्या




विद्यालयाचे आणि देशाचे नाव उज्ज्वल करावे, असा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त झालेल्या या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाभावना, उत्साह आणि नव्या उमेदीची प्रेरणा निर्माण झाली.

## जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर एमपीआयडी टॅब सुरु करा
### पतसंस्थांमधील ठेवीदारांच्या सुविधेसाठी बापुराव राजगुरु व नारायण मर्डेकर यांची मागणी

पाटोदा । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील विविध बहुराष्ट्रीय मल्टीस्टेट व पतसंस्थांमध्ये झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या आर्थिक अनियमिततेमुळे त्रस्त झालेल्या ठेवीदारांना माहिती मिळवणे सोपे जावे आणि प्रशासकीय कामात पारदर्शकता यावी, यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिकृत वेबसाईटवर 'मा. उपजिल्हाधिकारी एम पी आय डी हा स्वतंत्र टॅब सुरू करण्यात यावा, अशी आग्रही मागणी निवेदनाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे.

पाटोदा येथील बापुराव बाबूराव राजगुरू आणि बीड येथील नारायण नरहरी मर्डेकर यांच्यासह इतर ठेवीदारांनी हे निवेदन मा. जिल्हाधिकारी, बीड यांना सादर केले आहे.

वारंवार फेऱ्या मारण्यापासून ठेवीदारांची सुटका करण्याची मागणी

निवेदनात नमूद केल्यानुसार, बीड जिल्ह्याभरातील अनेक बहुराष्ट्रीय मल्टीस्टेट व पतसंस्थांवर केंद्रीय निबंधकांकडून (सेंट्रल रजिस्टर) आवसायनाची (लिक्विडर) कारवाई करण्यात आली आहे. या पतसंस्थांवर एम पी आय डी कायद्यांतर्गत होणारी कारवाई, जप्त मालमत्ता आणि ठेव परताव्याबाबतची अद्ययावत माहिती मिळवण्यासाठी ठेवीदारांना वारंवार जिल्हाधिकारी कार्यालयात फेऱ्या माराव्या लागत आहेत. यामुळे ठेवीदारांचा वेळ, पैसा आणि मानसिक श्रम वाया जात असून मोठी गैरसोय होत आहे. ही गैरसोय टाळण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावरच (वेबसाईट) सर्व माहिती ऑनलाईन उपलब्ध करून देण्याची विनंती करण्यात आली आहे.

'एम पी आय डी टॅबमध्ये १७ प्रमुख मुद्द्यांचा समावेश करण्याची मागणी

ठेवीदारांच्या पारदर्शकतेसाठी संकेतस्थळावरील प्रस्तावित टॅबमध्ये खालील बाबींचा समावेश करण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे:

संस्थेचे नाव व ठेवींची माहिती: बहुराष्ट्रीय मल्टीस्टेट व पतसंस्थांचे नाव, एकूण ठेवींची रक्कम आणि ठेव परतफेडीसाठी सादर केलेले एकूण दावे.

कर्ज व वसुलीचा तपशील: संस्थांचे एकूण दिलेले कर्ज, झालेली कर्ज वसुली आणि आवसायनाच्या प्रक्रियेसाठी आजपर्यंत झालेला एकूण खर्च.

दोषींवर कारवाई व गुन्हे: दोषी संचालक मंडळाची नावे, आवसायकांकडून (लिक्विडर) संचालक मंडळावर गुन्हे दाखल झाले आहेत का याचा तपशील आणि न्यायालयात दाखल झालेली एकूण चार्जशीट.

मालमत्ता जप्ती व एमपी आयडी कारवाई: एम पी आय डी कायद्यांतर्गत जप्त केलेल्या मालमत्तांचे वर्णन, त्या मालमत्तेवर इतर कोणाचे कर्ज आहे का याची माहिती, प्रसिद्ध झालेल्या राजपत्र अधिसूचना आणि शासनाकडे सादर केलेले जप्तीचे प्रस्ताव.

सोने-चांदी व गृह विभागातील प्रस्ताव: गृहविभाग (महाराष्ट्र शासन) कडे प्रलंबित असलेले एम पी आय डी चे प्रस्ताव, तसेच आजपर्यंत जप्त करण्यात आलेले एकूण सोने व चांदीचे प्रमाण.

साहित्य विक्रीतून प्राप्त रक्कम: पतसंस्थांच्या साहित्याची किंवा मालमत्तांची विक्री करून जमा झालेली एकूण रक्कम.

पारदर्शकतेमुळे हजारो ठेवीदारांना मिळणार दिलासा

बीड जिल्ह्यातील हजारो सामान्य नागरिक व शेतकाऱ्यांचे पैसे विविध पतसंस्थांमध्ये अडकले आहेत. प्रशासनाने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वेबसाईटवर ही सर्व माहिती सार्वजनिक केल्यास ठेवीदारांना घरबसल्या स्वतःच्या दाव्याची व कारवाईची स्थिती समजणे सोपे होईल. यामुळे प्रशासनाच्या कामकाजात पारदर्शकता येईल आणि ठेवीदारांची होणारी ससेहोलपट थांबेल, असा विश्वास निवेदक बापुराव राजगुरू, नारायण मर्डेकर व इतर ठेवीदारांनी व्यक्त केला आहे.

# ‘समृद्धी’च्या कामाला शेतकऱ्यांचा विरोध

नांदेड / प्रतिनिधी

जालना-नांदेड समृद्धी महामार्गासाठी भूसंपादन झालेल्या जमिनींची बाजारभावानुसार भरपाई आणि त्यावर १२ टक्के व्याज देण्याच्या मागणीवरून नांदेड तालुक्यातील बाधित शेतकरी आक्रमक झाले आहेत. शासनाने सुमारे १० कोटी ५० लाख रुपयांची व्याजाची रक्कम अदा केल्याशिवाय समृद्धी महामार्गाचे काम सुरू करू देणार नाही, असा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

समृद्धी महामार्गासाठी नांदेड तालुक्यातील काकांडी, तुप्पा, बाभूळगाव, गुंडेगाव, पांगरी, विष्णुपुरी, पिंपळगाव (कोरका), नाळेश्वर, कल्लाळ, जैतापूर, रहाटी आणि बोरगाव (तेलंग) आदी गावांतील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या आहेत. भूसंपादन करताना जमिनींचा बाजारभावानुसार मोबदला देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, अद्याप अपेक्षित मोबदला मिळाला नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. दरम्यान, महामार्गाच्या कामासाठी पुन्हा भूसंपादनाची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. रिंगरोड, सर्व्हिस रोड आणि इंटरचेंजसाठी काही शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्याच्या नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. त्यामुळे यापूर्वी संपादित केलेल्या जमिनींचा मोबदला आणि व्याजाचा प्रश्न निकाली निघाल्याशिवाय नव्या भूसंपादनास शेतकऱ्यांनी विरोध केला आहे. यापूर्वी संपादित केलेल्या जमिनींसाठी सुमारे १० कोटी ५० लाख रुपये व्याजाची रक्कम शासनाकडून शेतकऱ्यांना देणे बाकी असल्याचे सांगण्यात आले. या रकमेचा प्रस्ताव शासनाकडे पाठवून सुमारे आठ महिने झाले आहेत. मात्र अद्याप प्रस्तावाला मंजुरी मिळालेली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष वाढला असून, शासनाने मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला आहे.



# अननस लागवड : कमी खर्चात चांगला नफा



अननस लागवड ही महाराष्ट्रात आणि विशेषतः कोकण किनारपट्टीच्या भागात कमी खर्चात चांगला नफा मिळवून देणारा एक उत्तम व्यवसाय आहे. अननसाला बाजारात वर्षभर मोठी मागणी असते.

हवामान आणि जमीन :अननस लागवडीसाठी उष्ण आणि दमट हवामान अत्यंत पोषक असते. १५ ते ३५ तापमान या पिकासाठी उत्तम मानले जाते. जमिन चांगला निचरा होणारी, सेंद्रिय पदार्थांनी समृद्ध असलेली हलकी ते मध्यम जमीन या पिकासाठी योग्य असते. जमिनीचा सामू () ४.५ ते ५.५ च्या दरम्यान असावा.

जाएंट क्यू : ही जात प्रक्रियेसाठी आणि रसासाठी खूप प्रसिद्ध आहे. याचे फळ आकाराने मोठे असते. क्वीन : ही जात थेट खाण्यासाठी खूप लोकप्रिय आहे. याचे फळ आकाराने मध्यम, गोड आणि आकर्षक पिवळ्या रंगाचे असते. मॉरिशस : ही जात लवकर तयार होणारी आणि उत्तम चवीची आहे.

लागवडीची पद्धत आणि अंतर : पावसाळ्याच्या सुरुवातीला म्हणजेच जून ते ऑगस्ट दरम्यान लागवड करणे सर्वात फायदेशीर ठरते. अननसाची लागवड पिल्ले, स्लिप्स किंवा फळाच्या वरील मुकुटाने केली जाते. ३०० ते ४०० ग्रॅम वजनाचे सक्स लागवडीसाठी वापरावेत. दुहेरी ओळ पद्धतीचा वापर करावा. दोन ओळींतील अंतर: ६० सेमी. दोन रोपांतील अंतर: ३० सेमी. दोन जोड ओळींतील अंतर: ९० सेमी (या पद्धतीने एका एकरात साधारण १५,००० ते २०,००० रोपे बसतात.)

खत आणि पाणी व्यवस्थापन : लागवडीच्या वेळी जमिनीत भरपूर शेणखत मिसळावे. प्रति झाड साधारण १२ ग्रॅम नत्र, ४ ग्रॅम स्फुरद आणि १२ ग्रॅम पालाश तीन ते चार हप्त्यांमध्ये विभागून द्यावे. पावसाळ्यात स्वतंत्र पाण्याची गरज नसते. मात्र, हिवाळ्यात आणि उन्हाळ्यात १० ते १५ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. ठिबक सिंचन वापरल्यास पाण्याची मोठी बचत होते आणि फळांची वाढ छान होते.

काढणी आणि उत्पन्न : लागवडीनंतर साधारण १५ ते १८ महिन्यांत फळे तयार होतात. फळांचा रंग खालच्या बाजूने पिवळसर होऊ लागला की काढणी करावी. योग्य व्यवस्थापन केल्यास एका एकरातून २० ते २५ टन इतके उत्पन्न सहज मिळू शकते. अननसाची लागवड सुपारी, नारळ किंवा काजूच्या बागेमध्ये आंतरपीक म्हणूनही खूप यशस्वीरीत्या करता येते, ज्यामुळे मुख्य पिकांसोबतच अतिरिक्त उत्पन्न मिळते.

# पावसात सोयाबीन-पिकात पिवळेपणा? तात्काळ करा हे उपाय

सततचा पाऊस, ढगाळ वातावरण आणि जमिनीत साचून राहिलेले पाणी यामुळे सोयाबीनचे पीक पिवळे पडणे ही एक गंभीर समस्या आहे. यामुळे पिकाची प्रकाशसंश्लेषण (अन्न तयार करण्याची) प्रक्रिया मंदावते आणि उत्पादनात मोठी घट होऊ शकते.

सोयाबीन पिकात पिवळेपणा येण्याची मुख्य कारणे : मुळापाशी पाणी साचल्याने मुळांना ऑक्सिजन मिळत नाही. सततच्या पावसामुळे नायट्रोजन, लोह आणि सल्फर ही अन्नद्रव्ये जमिनीत वाहून जातात. पांढऱ्या माशीमुळे पसरणारा हा एक घातक विषाणूजन्य रोग आहे.





तात्काळ करायचे उपाय : शेतातील पाण्याचा निचरा करा -मुळांना मोकळा श्वास देऊ द्या.पिवळेपणा घालवण्यासाठी सर्वात आधी शेतात साचलेले पाणी चर काढून बाहेर काढा. जमिनीतील हवा खेळती राहिल्याशिवाय पिके अन्नद्रव्ये शोषून घेऊ शकत नाहीत. विद्राव्य खतांची फवारणी - नत्र आणि इतर घटकांची पूर्तता.पावसाने उघडीप देताच खालीलपैकी एका खताची फवारणी करावी:१९:१९:१९ (/नत्र, स्फुरद, पालाश): ७५ ते १०० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करा.जर जास्त पिवळेपणा असेल, तर युरिया २% तीव्रतेची (२०० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी) फवारणी करावी. चिलेटेड लोहाची फवारणी - सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता भरून काढणे. नव्याने येणारी पाने जर पिवळी किंवा पांढरी पडत असतील, तर ती लोहाच्या कमतरतेचे लक्षण आहे. यासाठी चिलेटेड लोह (१२%): १० ते १५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. पांढऱ्या माशीचे नियंत्रण - पिवळा मोझॅक नियंत्रणात ठेवणे.जर पाने पिवळी पडण्यासोबतच त्यावर हिरवे-पिवळे चट्टे दिसत असतील, तर तो पिवळा मोझॅक रोग असू शकतो. हा रोग पांढऱ्या माशीमुळे पसरतो.उपाय: याच्या नियंत्रणासाठी थायोमिथोक्झाम (३ ग्रॅम) किंवा ॲसिटामिप्रीड (४ ग्रॅम) प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करा. तसेच शेतात पिवळे चिकट सापळे लावावेत. पावसाळी वातावरणात कोणतीही फवारणी करताना औषधात सिलिकॉन आधारित स्टिकर (चिकटवणारे औषध) मिसळणे अत्यंत आवश्यक आहे. यामुळे फवारलेले औषध पानांवर व्यवस्थित चिकटून राहते आणि लवकर पाऊस आला तरी धुवून जात नाही.

# डाळींब हस्त बहार नियोजन वाचा महत्वाची माहिती!

सामान्यतः कमी पावसाच्या प्रदेशात डाळिंबाच्या हस्त बहार घेणे योग्य समजले जाते. परंतु परतीचा पावसामुळे या बहाराच्या नियोजनामध्ये अडसर निर्माण होऊ शकते. यासाठी योग्य व्यवस्थापन करणे गरजेचे असते. डाळिंब हस्त बहारातील ताण सोडणे आणि बहार नियमन कसे नियोजन करावे याविषयी माहिती जाणून घेतल्यास फायदा होतो.

डाळिंब हस्त बहार नियोजन : पावसाळा संपल्यानंतर बागेला २०-२५ दिवस पाणी देऊ नका. बागेला खताची मात्रा देताना फळबागांमध्ये पडलेली पाने, काडीकचरा काढून टाकावा, अथवा जमिनीत गाडून टाकावा. बागेतील झाडांना बसलेल्या



ताणाच्या तीव्रतेनुसार इथेफॉनचा वापर करून पानगळ करावी. बेमोसमी पाऊस किंवा इतर कारणांमुळे झाडांवर योग्य ताण बसला नसल्यास इथेफॉनच्या (३९ एसएल) दोन फवारण्या कराव्यात. पहिली फवारणी ०.९ मिली प्रति लिटर पाणी याप्रमाणे तर दुसरी फवारणी ५ ते ८ दिवसांनी पानांच्या पिवळेपणा नुसार १ ते १.५ मिली प्रति लिटर पाणी याप्रमाणे करावी. प्रत्येक इथेफॉन फवारणीमध्ये १२-६१-० किंवा ०-५२-३४ (५ ग्रॅम प्रति लिटर पाणी) मिसळून फवारणी करावी. झाडांना योग्य ताण बसला असल्यास पाने पिवळी असताना इथेफॉन (३९ ) १ मिली प्रति लिटर पाणी + १२-६१-० किंवा ०-५२-३४ ५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फांद्यांची घनता जास्त असल्यास, हवा खेळती राहण्यासाठी व सूर्यप्रकाश पोहोचण्यासाठी पेन्सिल आकाराच्या फांद्या शेंड्याकडून १० ते १५ सें.मी. कट करून हलकी छाटणी करावी. खोडापासूनचे फुटवे काढावेत. पाऊस थांबल्यानंतर आणि हवामान स्वच्छ झाल्यानंतरच कीटकनाशके आणि बुरशीनाशकांची फवारणी करावी.

# रब्बी हंगामात हरभरा लागवड

महाराष्ट्रात हरभरा हे रब्बी हंगामातील एक अत्यंत महत्त्वाचे आणि फायदेशीर पीक आहे. हरभऱ्याचे चांगले उत्पादन मिळवण्यासाठी योग्य वाण, योग्य वेळ आणि आधुनिक व्यवस्थापन खूप महत्त्वाचे असते. चला तर हरभरा लागवडीची संपूर्ण माहिती जाणून घेऊ या.

जमीन आणि हवामान : हरभऱ्यासाठी मध्यम ते भारी, खोल आणि चांगला निचरा होणारी जमीन उत्तम असते. पिकासाठी जमिनीचा सामू ६.५ ते ७.५ असावा. पाणथळ किंवा पाण्याचा निचरा न होणाऱ्या जमिनीत हरभरा लावू नये. हरभऱ्याला थंड आणि कोरडे हवामान लागते. पेरणीच्या वेळी आणि वाढीच्या काळात थंड हवामान पिकासाठी फायदेशीर असते.

लागवडीचा / पेरणीचा काळ :जिरायती (कोरडवाहू) हरभरा: २० ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर (जमिनीतील ओलावा टिकून असताना पेरणी करावी). बागायती हरभरा: २० ऑक्टोबर ते २० नोव्हेंबर दरम्यान पेरणी पूर्ण करावी.

सुधारित वाण :उत्पादनाच्या दृष्टीने महात्मा फुले कृषी विद्यापीठ (राहुरी) आणि इतर संशोधन केंद्रांनी विकसित केलेले वाण वापरणे उत्तम ठरते. विशाल - बागायती व जिरायती दोन्हीसाठी उत्तम, दाणे मोठे आणि तांबूस रंगाचे. दिग्विजय - मर रोगास प्रतिकारक, बागायतीसाठी अत्यंत लोकप्रिय. विजय - मध्यम आकाराचे दाणे, दुष्काळ सहन करण्याची क्षमता जास्त. कृपा / विराट (काबुली) - मोठ्या दाण्यांचा काबुली हरभरा, निर्यातीसाठी आणि चांगल्या बाजाराभावासाठी योग्य.

बियाणे प्रमाण आणि बीजप्रक्रिया :लहान





दाण्याचे वाण (विजय): ३० ते ३५ किलो प्रति एकर. मध्यम/मोठे दाणे (विशाल, दिग्विजय): ३५ ते ४० किलो प्रति एकर. काबुली हरभरा: ४५ ते ५० किलो प्रति एकर.

बुरशीनाशक : पेरणीपूर्वी ट्रायकोडेर्मा (५ ग्रॅम) किंवा थायरम + कार्बेन्डाझिम (३ ग्रॅम) प्रति किलो बियाण्याला चोळावे (यामुळे मर रोग रोखता येतो). जीवाणू संवर्धन: यानंतर रायझोबियम आणि पी.एस.बी. () प्रत्येकी २५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास लावून सावलीत सुकवून पेरणी करावी.

पेरणीचे अंतर :जिरायती: दोन ओळींत ३० सेमी आणि दोन रोपांत १० सेमी अंतर ठेवावे. बागायती: दोन ओळींत ४५ सेमी आणि दोन रोपांत १० सेमी अंतर ठेवावे. पेरणी ५ ते ६ सेमी खोलीवर करावी, जेणेकरून बियाण्याला जमिनीत पुरेसा ओलावा मिळेल.

खत व्यवस्थापन :हरभरा हे द्विदल पीक असल्याने ते हवेतील नत्र शोषून घेते, त्यामुळे जास्त रासायनिक खतांची गरज नसते.

खताची मात्रा (प्रति एकर) :१० किलो नत्र (२० किलो युरिया). २० किलो स्फुरद (१२५ किलो सिंगल सुपर फॉस्फेट). १० किलो पालाश (१५ किलो म्युरेट ऑफ पोटॅश). ही सर्व खते पेरणीच्या वेळीच द्यावीत.

पाणी व्यवस्थापन :हरभऱ्याला जास्त पाण्याची गरज नसते. अति पाण्यामुळे पीक पिवळे पडते किंवा मर रोगाचा प्रादुर्भाव होतो. पहिले पाणी: पेरणीनंतर ३० ते ३५ दिवसांनी (घाटे धरण्यापूर्वी/फांद्या फुटताना). दुसरे पाणी: पेरणीनंतर ६० ते ६५ दिवसांनी (घाटे भरण्याच्या वेळी). (टीप: पीक फुलोऱ्यात असताना पाणी देणे टाळावे, अन्यथा फुले गळतात).

कीड व रोग नियंत्रण :घाटे अळी - प्रतिबंधात्मक उपाय: शेतात प्रति एकरी ५-६ कामगंध सापळे आणि १०-१२ पक्षी थांबे उभारावेत. अळी लहान असताना: ५% निंबोळी अर्क किंवा एच.एन.पी.व्ही.ची फवारणी करावी. प्रादुर्भाव जास्त असल्यास इमामेक्टिन बेन्झोएट (५ ) १० ग्रॅम किंवा क्लोरँट्रानिलीप्रोल ३-४ मि.ली. प्रति १५ लिटर पाण्यात मिसळून फवारावे. मर रोग - हा रोग जमिनीत असणाऱ्या बुरशीमुळे होतो. यावर सर्वोत्तम उपाय म्हणजे योग्य बीजप्रक्रिया करणे आणि शेतात पाण्याचा निचरा व्यवस्थित ठेवणे.

शेंडे खुडणे :पेरणीनंतर ३० ते ३५ दिवसांनी जेव्हा झाड १५ ते २० सेमी उंच होते, तेव्हा झाडांचे वरचे कोवळे शेंडे खुडावेत. यामुळे झाडाला बाजूने जास्त फांद्या फुटतात, फुलांची संख्या वाढते आणि पर्यायाने उत्पादनात २० ते २५% वाढ होते.उत्पादन : योग्य व्यवस्थापन केल्यास जिरायती: ६ ते ८ क्विंटल प्रति एकर. बागायती: १० ते १५ क्विंटल प्रति एकर उत्पादन सहज मिळते.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१५७४ : गुरू रामदास शिखांचे चौथे गुरू बनले.
१६५९ : मुघल शासक औरंगजेब यांनी आपला मोठा भाऊ दारा शिकोह यांना फाशी दिली.
१८३५ : ऑस्ट्रेलियातील मेलबर्न शहराची स्थापना झाली.
१८३५ : अमेरिकेतील ह्युस्टन शहराची स्थापना झाली.
१९२८ : पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली भारतीय स्वातंत्र्य लीग ची स्थापन करण्यात आली.
१९४५ : दुसरे महायुद्ध ब्रिटिश सैन्याने हाँगकाँगची जपानच्या अधिपत्यातुन सुटका केली.
१९७९ : सुमारे दहा लाख हायड्रोजन बॉम्बच्या स्फोटांएवढी ऊर्जा निर्माण करुन 'हॉवर्ड-कुमेन-मायकेल्स' हा धूमकेतू सूर्याच्या पृष्ठबागावर आदळला. सूर्याच्या पृष्ठभागावर धूमकेतू आदळण्याची मानवी इतिहासातील ही पहिली नोंद आहे.
१९८४ : अमेरिकन अंतराळ यान डिस्कव्हरी ने पहिल्यांदा अवकाशात भरारी केली.
२००९ : भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) ने चंद्रयान-१ मोहीम ही औपचारिकरित्या समाप्त केली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५५९ : मुघल सम्राट अकबर यांचा मुलगा जहांगीर ४ यांचा जन्मदिन.
१५६९ : जहांगीर ४ था मुघल सम्राट (मृत्यू: २८ आक्टोबर १६२७)
१७२० : व्हिटब्रेड हॉटेल्स चे संस्थापक सॅम्युअल व्हिटब्रेड यांचा जन्म. (मृत्यू: ११ जून १७९६)
१८१२ : ब्यूएना विस्टा वाइनरी चे संस्थापक अगोगोस्टन हरसत्थी यांचा जन्म. (मृत्यू: ६ जुलै १८६९)
१८१३ : ना. धों. ताम्हनकर लेखक, बालसाहित्यिक (मृत्यू: ५ जानेवारी १९६१)
१८५० : काशिनाथ त्र्यंबक तेलंग प्राच्यविद्या संशोधक, न्यायमूर्ती, कायदेपंडीत, समाजसुधारक, अखिल भारतीय काँग्रेसचे एक संस्थापक, काँग्रेसचे चिटणीस (१८८५-१८८९), मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू (१८९२), हिंदू कायद्यात सुधारणा होण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. भगवद्गीतेचा त्यांनी इंग्रजीत अनुवाद केला. (मृत्यू: १ सप्टेंबर १८९३)
१८७१ : अर्नेस्ट रुदरफोर्ड नोबेल पारितोषिक विजेते ब्रिटिश भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: १९ आक्टोबर १९३७)
१८८३ : जगन्नाथ गणेश गुणे तथा स्वामी कुवलयानंद योगविद्येचे पुरस्कर्ते व शारीरिक शिक्षणतज्ञ, त्यांनी १९२४ मध्ये 'कैवल्यधाम' नावाची योगशिक्षणसंस्था स्थापन केली. संस्थेतील प्रयोगांची माहिती व्हावी यासाठी 'योगमीमांसा' नावाचे त्रैमासिक काढले. त्याचे ७ खंड प्रकाशित झाले आहेत. (मृत्यू: १८ एप्रिल १९६६ मुंबई)
१९०३ : भगवतीचरण वर्मा हिन्दी कथाकार, कादंबरीकार, कवी, एकांकिकाकार, पटकथाकार व नाटककार, पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित लेखक (मृत्यू: ५ आक्टबर १९८१)
१९०४ : नवल होर्मुसजी टाटा उद्योगपती, पद्मभूषण १९६९
१९२३ : शंकरदास केसरीलाल ऊर्फ 'शैलेन्द्र' गीतकार (मृत्यू: १४ डिसेंबर १९६६)
१९३० : वॉरन बफे अमेरिकन उद्योगपती आणि दानशूर
१९३० : दशरथ पुजारी संगीतकार (मृत्यू: १३ एप्रिल २००८ डोंबिवली, मुंबई)
१९३४ : बाळू गुप्ते लेग स्पिन गोलंदाज (मृत्यू: ५ जुलै २००५)
१९३७ : मॅक्लारेन रेसिंग टीम चे संस्थापक ब्रुस मॅक्लारेन यांचा जन्म. (मृत्यू: २ जून १९७०)
१९५४ : बेलारूस देशाचे पहिले अध्यक्ष अलेक्झांडर लुकासेंको यांचा जन्म.
१९५४ : भारतीय वकील आणि राजकारणी रवीशंकर प्रसाद यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७७३ : सुमेर गार्दी याने नारायणराव पेशवे यांची शनिवारवाड्यात हत्या केली. (जन्म: १० ऑगस्ट १७५५)
१९४० : सर जे. जे. थॉमसन इलेक्ट्रॉनच्या शोधाबद्दल १९०७ चे नोबेल पारितोषिक विजेते इंग्लिश भौतिकशास्त्रज्ञ (जन्म: १८ डिसेंबर १८५६)
१९४७ : नारायण मुरलीधर गुप्ते ऊर्फ 'कवी बी' त्यांची ‘चाफा बोलेना, चाफा चालेना ‘ ही कविता खूप प्रसिद्ध आहे. (जन्म: १ जून १८७२)
१९५२ : भारतीय रिजर्व बँकेचे पहिले गव्हर्नर ओसबोर्न स्मिथ यांचे निधन.
१९८१ : जयंत पांडुरंग तथा 'जे. पी.' नाईक शिक्षणतज्ञ, 'इंडियन इन्स्टिट्युट ऑफ एज्युकेशन'चे संस्थापक, 'नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च अँड ट्रेनिंग'चे संस्थापक, भारतामध्ये प्रथमच स्थापन केल्या गेलेल्या शैक्षणिक आयोगाचे सभासद सचिव (जन्म: ५ सप्टेंबर १९०७)
१९९४ : शंकर गोपाळ तथा शं. गो. तुळपुळे प्राचीन मराठी भाषेचे गाढे व्यासंगी, संत वाङ्मयाचे अभ्यासक व संशोधक, पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख (जन्म: ५ फेब्रुवारी १९१४)
१९९८ : नरहर वामन तथा 'नरुभाऊ' लिमये स्वातंत्र्यसैनिक, निर्भिड पत्रकार व काँग्रेसचे तत्त्वनिष्ठ नेते (जन्म: ८ नोव्हेंबर १९०९)
१९९९ चार्ल्स ब्रॉन्सन अमेरिकन अभिनेता (जन्म: ३ नोव्हेंबर १९२१)
२००८ : प्रसिद्ध भरतीय उद्योगपती व बिर्ला कुटुंबातील सदस्य कृष्ण कुमार बिर्ला यांचे निधन.
२०१४ : भारतीय मार्क्सवादी इतिहासकार व आधुनिक भारतातील आर्थिक आणि राजकीय इतिहासातील तज्ञ बिपीन चंद्र यांचे निधन. (जन्म: २७ मे १९२८)
२०१५ : भारतीय विद्वान लेखक एम. एम. कळबुर्गी यांचे निधन. (जन्म: २८ नोव्हेंबर १९३८)



राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत
सोमवार दि.३१ ऑगस्ट २०२६ ५



# परमेश्वरावरील गाढ श्रद्धा मानवाला शुद्ध आचरण करण्यास प्रवृत्त करते-मौलाना अबरारुल हसन रहमानी

उदगीर। प्रतिनिधी

पैगंबर मुहम्मद सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांच्या जीवन व शिकवणीचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने परिवर्तन सीरत कमिटी, उदगीर, जि. लातूर यांच्या वतीने बुधवार, दि. २६ ऑगस्ट २०२६ रोजी इजलास-ए-आमचे आयोजन करण्यात आले. भाजी मार्केट, पतेवार चौक, उदगीर येथे झालेल्या या कार्यक्रमास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.कार्यक्रमाची सुरुवात हाफिज सय्यद हुजैफा तौहीद खतीब यांनी पवित्र कुराण पठणाने केली. त्यानंतर हाफिज मुदस्सिर नबी शेख यांनी आपल्या गोड आवाजात नात अर्थात पैगंबर स्तुतीगीत सादर केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हजरत मौलाना हाफिज सय्यद जियाउद्दीन मजाहिरी साहेब होते. प्रमुख उपस्थिती म्हणून मा. नगरसेवक अहमद सरवर , नगरसेवक सय्यद इमरान पाशा, मौलाना मुजम्मिल खासमी साहब, सामाजिक कार्यकर्ते सनाउल्लाह खान, सामाजिक कार्यकर्ते ओम गांजुरे आणि अब्रार पठाण, १ हॉटेलचे मालक लईक खान उपस्थित होते.

प्रमुख वक्ते हजरत मौलाना अबरारुल हसन रहमानी



साहेब, हैदराबाद आणि मौलाना मोईजुद्दीन कासमी साहेब, लातूर यांनी पैगंबर मुहम्मद सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांच्या जीवनातील विविध प्रसंग, त्यांची शिकवण, मानवतेप्रती असलेली करुणा, सामाजिक न्याय, बंधुभाव, शांतता आणि नैतिक मूल्ये यावर सविस्तर प्रकाश टाकला. मौलाना अबरारुल हसन रहमानी यांनी पैगंबर मुहम्मद सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांनी दिलेल्या मूलमंत्राचा उल्लेख करत, अल्लाहवरील श्रद्धेला जीवनात अत्यंत महत्त्व असल्याचे स्पष्ट केले. श्रद्धा जितकी दृढ असेल, तितकेच मनुष्याचे आचरण शुद्ध राहते. पैगंबरांची सुन्नत म्हणजेच त्यांचे आचरण आपल्या जीवनात आणण्यासाठी आपण सदैव प्रयत्नशील असले पाहिजे, असे त्यांनी सांगितले. परमेश्वरावरील भक्तीचा परिणाम आपल्या आचरणातून दिसून आला पाहिजे; तरच ती भक्ती सार्थ ठरते, असेही त्यांनी स्पष्ट केले. मराठी भाषेत मार्गदर्शन करताना अब्दुल मुजीब देवणीकर यांनी पैगंबर मुहम्मद सल्लल्लाहु अलैहि वसल्लम हे मानवतेचे उपकारक असून ते संपूर्ण मानवजातीसाठी मार्गदर्शक असल्याचे सांगितले.

तसेच पैगंबर आणि महामानव यातील फरकही त्यांनी स्पष्ट करून सांगितला. वक्त्यांनी पैगंबर मुहम्मद सल्लल्लाहु अलैहि वसल्लम हे संपूर्ण मानवजातीसाठी दया, प्रेम, क्षमा आणि मार्गदर्शनाचा आदर्श असल्याचे सांगितले. त्यांच्या जीवनातून आजच्या समाजाला मिळणारा संदेश आणि त्यांच्या शिकवणीची वर्तमान काळातील उपयुक्तताही त्यांनी स्पष्ट केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हाफिज अब्दुल अजीज राजा पटेल यांनी केले. परिवर्तन सीरत कमिटीच्या वतीने दरवर्षी उदगीर येथे अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. अझरोद्दीन शमशोद्दीन शेख हे परिवर्तन सीरत कमिटीचे संस्थापक अध्यक्ष असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली सीरतविषयक विविध उपक्रम राबविले जातात. कार्यक्रमाच्या शेवटी परिवर्तन सीरत कमिटीचे संस्थापक अध्यक्ष अझरोद्दीन शमशोद्दीन शेख यांनी आभार मानले. दरवर्षी अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्याची परंपरा अखंडितपणे सुरू ठेवू, असा विश्वास त्यांनी उपस्थित श्रोत्यांसमोर व्यक्त केला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिवर्तन सीरत कमिटीचे पदाधिकारी, व मौलाना अजीज पटेल, सामाजिक कार्यकर्ते शेख हमीद, कुरेशी उमर, सद्दाम बागवान, अन्सार सिद्दिकी तसेच इतर कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. याशिवाय अनेकांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य केले. उपस्थित नागरिकांनी कार्यक्रमाचे कौतुक करत, पैगंबर मुहम्मद सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांच्या जीवन व शिकवणीचा संदेश समाजात अधिक व्यापकपणे पोहोचविण्याची गरज व्यक्त केली.

## ११ वर्षे न्यायालयीन वेळ वाया घालवणाऱ्या अशील व वकिलास प्रत्येकी ५ लाखांचा दंड

जालना। प्रतिनिधी

न्यायालय म्हणजे लोकांच्या मनोरंजनासाठी उभारलेले नाट्यगृह किंवा प्रेक्षागृह नव्हे. स्वतःच्या चुका झाकण्यासाठी आणि सूड उगवण्यासाठी न्यायव्यवस्थेचा गैरवापर सहन केला जाणार नाही,'' अशा अत्यंत कडक शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने अशिलाच्या गोपनीयतेचा भंग करणाऱ्या एका वकिलाला आणि त्याच्या माजी महिला अशिलाला जोरदार फटकारले आहे. तब्बल ११ वर्षे न्यायव्यवस्थेचा अमूल्य वेळ वाया घालवल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने दोन्ही पक्षकारांवर प्रत्येकी ५ लाख रुपयांचा दंड ठोठावून सर्व याचिका फेटाळून लावल्या आहेत. हे प्रकरण मुंबईतील महिला अशील रेहाना खान आणि वकील रिझवान सिद्दीकी यांच्यातील वादाशी संबंधित आहे. संबंधित महिलेने वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याविरुद्ध केलेल्या तक्रारीसंदर्भात वकिलाकडे दिलेली गोपनीय माहिती व वैयक्तिक संभाषणांचे रेकॉर्डिंग या वकिलाने टीव्ही वाहिन्यांवर उघड केले होते. बार कौन्सिल ऑफ इंडियाच्या शिस्तपालन समितीने व्यावसायिक गैरवर्तणुकीचा ठपका ठेवत वकील रिझवान सिद्दीकी यांची सनद दोन वर्षांसाठी निलंबित केली होती आणि दंड ठोठावला होता. या शिक्षेविरुद्ध वकिलाने आव्हान दिले होते, तर संबंधित महिलेने वकिलाविरुद्ध कायमस्वरूपी निलंबन व २ कोटी रुपयांच्या भरपाईची मागणी करत सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती.

सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती विक्रम नाथ, न्यायमूर्ती संदीप मेहता आणि न्यायमूर्ती विजय बिष्णोई यांच्या खंडपीठाने बार कौन्सिलचा निर्णय कायम ठेवला. खंडपीठाने स्पष्ट केले की, अशिलाशी मतभेद झाले तरीही वकिलाने गोपनीयतेचा भंग करणे कोणत्याही परिस्थितीत समर्थनीय ठरू शकत नाही. त्याचवेळी मूळ तक्रारदार महिलेनेही अनेक तथ्ये लपवून न्यायालयात स्वच्छ हाताने दाद मागितली नसल्याचे ताशेरे न्यायालयाने ओढले. ज्या गरजू पक्षकारांना खरोखरच न्यायाची गरज आहे, त्यांचा तब्बल ११ वर्षांचा वेळ या दोघांनी खोट्या नाट्यात वाया घालवला, असे नमूद करत न्यायालयाने दोघांनाही सर्वोच्च न्यायालय विधी सेवा समितीकडे प्रत्येकी ५ लाख रुपयांचा दंड चार आठवड्यांत जमा करण्याचे आदेश दिले आहेत.कायदेशीर नीतिमत्तेचा आणि गोपनीयतेचा मोठा विजय : ॲड. महेश धन्नावत या महत्त्वपूर्ण निकालावर प्रतिक्रिया व्यक्त करताना ॲड. महेश धन्नावत यांनी सांगितले की, ''सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय वकिली व्यवसायातील व्यावसायिक नैतिकता आणि गोपनीयतेच्या तत्त्वाला अधिक बळकट करणारा आहे. वकील आणि अशील यांच्यातील नाते हे पूर्णपणे विश्वासावर आधारलेले असते. कोणताही वाद निर्माण झाला तरी अज्ञानाने किंवा रागाच्या भरात अशिलाची गोपनीय माहिती सार्वजनिक व्यासपीठावर आणणे हे कायदेविषयक नीतिमत्तेच्या विरोधात आहे. तसेच, न्यायालयांचा अमूल्य वेळ वैयक्तिक सूडबुद्धीसाठी वाया घालवणाऱ्यांना ५ लाखांचा दंड ठोठावून न्यायालयाने दिलेला हा संदेश न्यायव्यवस्थेचा मान राखण्यासाठी अत्यंत आवश्यक आणि ऐतिहासिक आहे.

## धर्मवीर संभाजी सार्वजनिक वाचनालयातर्फे विविध क्षेत्रात निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार

शिरूर अनंतपाळ । प्रतिनिधी

डिगोळ येथील चार नवयुकांना विविध क्षेत्रात कार्य करण्यासाठी परवा निवड झाली असुन त्या निवडी धारकांचा धर्मवीर संभाजी सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने राजहंस इंग्लीश स्कूल येथे शाल श्रीफळ फेटा ट्राफी देवून शनिवारी वाचनालयाचे अध्यक्ष भाऊसाहेब बिरादार यांनी सत्कार केला आहे

यावेळी ईसाक रोशन मुजेवार यांची कोल्हापुर येथे पदवीधर शिक्षक म्हणून निवड झाली आहे तर सुप्रिया संजय वाडकर यांची पालघर येथे क्लार्क म्हणून निवड झाली आहे तसेच वैभव चंद्रकात बिरादार याची लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा दैठणा येथे निवड झाली आहे तर आशिष रामदास एकूर्के याची वकिली क्षेत्रात



निवड झाली आहे या चारही युवकानी घवघवीत यश संपादन केले असल्याने त्यांचा आई वडिलाच्या समवेत सत्कार करण्यात आला आहे. यावेळी याकार्यकमाच्या अध्यक्षस्थानी वाचनालयाचे अध्यक्ष भाऊसाहेब पंडितराव बिरादार हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून मारोती रामा बिरादार. सेवानिवृत विस्तार अधिकारी बी टी पाटील.दिलीप बिरादार. राजहंस इंग्लिश स्कूलचे संस्थापक एकनाथ बिरादार. बापुराव बिरादार. सोसायटीचे संचालक संजय बिरादार. इंग्लीश स्कूल च्या संस्था अध्यक्षा सिमा एकनाथ बिरादार. बस्वराज चावरे. पंढरीनाथ वाडकर. आदि उपस्थित होते या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रामदास एकर्के यानी केले तर सुत्रसंचालन एकनाथ बिरादार यानी तर आभार कार्यक्रमाचे अध्यक्ष भाऊसाहेब बिरादार यानी मानले

## गुडसूर येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी

गुडसूर। प्रतिनिधी

साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती गुडसूर येथे विविध उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमात लहान बालकांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्यावर व विचारांवर प्रभावी भाषणे करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे बालकांनी घेतलेली भाषणे होय. या चिमुकल्या वक्त्यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य, शाहिरी, सामाजिक संघर्ष आणि परिवर्तनवादी विचारांवर आपल्या अनुभवातून व अभ्यासातून विचार मांडले. बालकांमध्ये वाचनाची आवड, वक्तृत्वकौशल्य आणि महापुरुषांच्या विचारांची जाणीव निर्माण व्हावी, या उद्देशाने सर्व बालवक्त्यांना पुस्तके देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषद सदस्य मा. उषाताई



येमुनाजी भुजबळ मॅडम तसेच पंचायत समिती सभापती मा. बाळासाहेब मरलापल्ले साहेब उपस्थित होते. त्यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत त्यांच्या विचारांचा आजच्या पिढीने आदर्श घ्यावा, असे आवाहन केले. यावेळी प्रमुख वक्ते श्री. प्रा शिवाजीराव देवनाळे सर व श्री. प्रा व्यंकट सूर्यवंशी सर यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यिक व सामाजिक योगदानाबाबत मार्गदर्शन केले. अण्णाभाऊंनी आपल्या लेखणी, शाहिरी आणि साहित्याच्या माध्यमातून कष्टकरी, शोषित व वंचित समाजाच्या प्रश्नांना वाचा फोडली. त्यांच्या विचारांची प्रेरणा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याची गरज असल्याचे वक्त्यांनी सांगितले. कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांनी बालकांच्या वक्तृत्वाचे कौतुक करून त्यांना पुढील शैक्षणिक व सामाजिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. ''पुस्तक हेच परिवर्तनाचे प्रभावी साधन असून वाचनातून विचार आणि विचारातून परिवर्तन घडते,'' असा संदेश यावेळी देण्यात आला. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या कार्यक्रमामुळे गुडसूर येथे सामाजिक प्रबोधन, वाचन संस्कृती आणि महापुरुषांच्या विचारांचा जागर करण्याचा उपक्रम घडून आला. कार्यक्रमास ग्रामस्थ, समाजबांधव, विद्यार्थी, शिक्षक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गुन्ह्यातील दोन आरोपी स्थानिक गुन्हे शाखेकडून ताब्यात

### वासनगाव पाटी येथे सापळा रचून दोघांना अटक; गुन्ह्यातील इतर आरोपींचा शोध सुरू.

लातूर। प्रतिनिधी

पोलीस ठाणे विवेकानंद चौक, लातूर येथे दाखल असलेल्या खुनाच्या गुन्ह्यातील पाहिजे असलेल्या दोन आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दि. २९ ऑगस्ट रोजी बासनगाव पाटी येथे सापळा रचून ताब्यात घेतले आहे. पोलीस ठाणे विवेकानंद चौक, लातूर येथे गु.र.नं. ६१५/२०२६, कलम १०३(१), १८९(२), १९०, १९१(२), ११५(२), ३५२, ३५१(२)(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्यातील पाहिजे असलेल्या आरोपींचा शोध घेण्यासाठी वरिष्ठांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पथक कार्यरत होते.दि. २९ ऑगस्ट रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने वासनगाव पाटी परिसरात सापळा लावून दोन इसमांना ताब्यात घेतले.

ताब्यात घेतलेल्या आरोपींची नावे



: १) बालाजी मोतीराम मस्के, वय ४४ वर्षे, रा. बौद्धविहाराच्या पाठीमागे, बाभळगाव, ता. जि. लातूर. २) बालाजी हनुमंत फिस्के, वय ३४ वर्षे, व्यवसाय व्यापार, रा. ओम हनुमे मंगल कार्यालयासमोर, महाराणा प्रताप नगर, लातूर. असे असून प्राथमिक चौकशीत नमूद आरोपींनी त्याच्या इतर साथीदारासह दि. २६ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी सुमारे ११.४५ वाजता बाभळगाव नाक्याकडे जाणाऱ्या रिंग रोडवरील यशोदिप हायड्रोलिक दुकानासमोर गुन्ह्यातील मयत किरण कालिदास सगर याच्यावर पाच जणांनी मिळून लाठी-काठ्यांनी मारहाण केली होती. सदर मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या किरण सगर याचा काल रोजी उपचारादरम्यान मृत्यू झाला. गुन्ह्यातील फरार आरोपी किशोर मस्के व इतर आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलीस पथकाकडून पुढील तपास व कारवाई सुरू आहे.ताब्यात घेतलेल्या दोन्ही आरोपींना पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी पोलीस ठाणे विवेकानंद चौक, लातूर यांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक, लातूर श्री अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक पांडुरंग माने, पोलीस उपनिरीक्षक राजाभाऊ बाबुराव घाडगे, तसेच पोलीस अंमलदार युवराज गिरी, राजेश कंचे, हरी पतंगे, मोहन सुरवसे, रामदास बाचीफळे, सिद्धेश्वर मदने, जमीर शेख, राहुल कांबळे, काकासाहेब बोचरे व संतोष खांडेकर यांच्या पथकाने केली.

## आ. खोतकर व पत्नी सीमाताई यांच्या उपस्थितीत चौधरी नगर येथे तीज महोत्सव उत्साहात साजरा

जालना। प्रतिनिधी

चौधरीनगर येथे महाराष्ट्रातील तीज महोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या विशेष कार्यक्रमात आ.अर्जुनराव खोतकर,सौ. सीमाताई खोतकर यांनी उपस्थित राहून महिला भगिनींना तीज महोत्सवाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. पारंपरिक वेशभूषा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि उत्साहपूर्ण वातावरणामुळे संपूर्ण कार्यक्रमाला विशेष रंगत आली. तीज महोत्सवानिमित्त बंजारा समाजातील महिला भगिनी मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. पारंपरिक वेशभूषेत सजलेल्या महिलांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांसह पारंपरिक नृत्य सादर केले. यावेळी सौ. सीमाताई खोतकर यांनी बंजारा समाजातील भगिनींसोबत उत्स्फूर्तपणे नृत्यात सहभाग घेतला आणि महिलांसोबत आनंदाने ठेका धरला. त्यांच्या या सहभागामुळे उपस्थित महिला भगिनींच्या उत्साहात आणखी भर पडली.

सौ. सीमाताई यांनी कोणताही




औपचारिकपणा न ठेवता महिलांमध्ये मिसळून त्यांच्या आनंदात सहभागी होत पारंपरिक नृत्य केले. यावेळी उपस्थित महिलांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांच्या सहभागाचे स्वागत केले. बंजारा समाजाच्या पारंपरिक संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या या सोहळ्यातील हा क्षण उपस्थितांसाठी विशेष आकर्षणाचा ठरला. यावेळी आमदार अर्जुनराव खोतकर यांनी उपस्थित महिला भगिनींशी संवाद साधत तीज महोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. सण-उत्सव हे समाजाला एकत्र आणण्याचे तसेच आपल्या समृद्ध संस्कृती आणि परंपरांचे जतन करण्याचे प्रभावी माध्यम असल्याचे त्यांनी सांगितले. महिला भगिनींचा सामाजिक, सांस्कृतिक आणि विविध क्षेत्रांतील सहभाग वाढावा, यासाठी अशा उपक्रमांना प्रोत्साहन मिळणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले. तीज महोत्सवाच्या माध्यमातून महिलांना एकत्र येत आपला आनंद व्यक्त करण्याची आणि पारंपरिक संस्कृतीचा उत्सव साजरा करण्याची संधी मिळाली. विशेषतः बंजारा समाजातील पारंपरिक नृत्य, वेशभूषा आणि सांस्कृतिक सादरीकरणामुळे कार्यक्रमाची शोभा वाढली.

विजय चव्हाण यांच्या नेतृत्वात सुरू असलेल्या उपोषणाला सर्व प्रथम उपस्थित राहुल उद्योग मंत्री उदय सामंत यांना उपोषण स्थळी नेऊन उपोषणकर्त्यांचे सविस्तर चर्चा घडवली व बंजारा समाज बांधवांच्या एस. टी. आरक्षण संदर्भात विधानसभेत आवाज उठवला या वेळी ॲड. उत्तम राठोड, बाबुराव पवार,अविनाश चव्हाण, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सेवानिवृत्त सचिव मोहन राठोड, नाईक विजय चव्हाण ( बंजारा संघर्ष योद्धा) उद्धव पवार, जिजाबाई राठोड, मीराबाई जाधव, संजय जाधव, रमेश चव्हाण, यांच्यासह परिसरातील बांधवांची उपस्थिती होती.

## शिरूर अनंतपाळ तालुक्यात इयत्ता ४ थी व ७वी शिष्वृती परीक्षेमध्ये वर्चस्व कायम

### तब्बल ५३ विद्यार्थी झाले शिष्वर्ती धारक



शिरूर अनंतपाळ। प्रतिनिधी

तालुक्यातील इयत्ता ४थी व ७वी च्या विद्यार्थ्याचे उज्वल यश जिल्हा परिषद शाळेचा टक्का वाढला शिरूर अनंतपाळ जिल्हा परिषद प्रा, कन्या शाळा ,९ जी,परिषद प्रा,शाळा डीगोळ, ८तर तळेगाव बोरी जी परिषद शाळा ९ ,केंद्रीय जी, परिषद शाळा कांबळगा ३ , साकोळ ३ ,थेरगाव ,१, गणेशवाडी,१,सावरगाव १, हिप्पळगाव १, लक्कडजवलगा १,धनगरवाडी १ ,आनंदवाडी १, असे एकूण चौथी चे ४० विद्यार्थी शिष्वृती धारक बनले तर इयत्ता ७वी चे जी,परिषद शाळा सय्यद अंकुलगा १ , हिप्पळगाव १ , शिवपूर १ ,धामणगाव १ , येरोळ १ , हिसामाबाद जी,परिषद शाळा १ , अजनी बु,१ , वाजारखेडा १ , धामणगाव संत भगवान बाबा विद्यालय १ ,इंदिरा गांधी विद्यालय हिसामाबाद २,प्रेमनाथ विद्यालय थेरगाव १ ,संस्कार वर्धनी पा,वांगे विद्यालय आनंदवाडी १,असे इ, ७वी चे १३विद्यार्थी शिष्वर्ती धारक बनले आहेत तालुक्यातून पालकवर्गातून गटशिक्षण अधिकारी अनिल पागे व सर्व शाळेतील.मुख्याध्यापक ,शिक्षक यांचे सर्व स्तरावरून अभिनंदन केले जात आहे ग्रामीण भागातील शिक्षक सुद्धा काहीं कमी नाहीत हे शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी दाखवून दिले आहे.

# नदी भूमाफियांच्या विळख्यात; नदीपात्र झाले अरुंद, प्रशासनाचे दुर्लक्ष

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातून वाहणारी बिंदुसरा नदी सध्या अतिक्रमण आणि अस्वच्छतेच्या विळख्यात सापडली आहे. शहराच्या ओळखीचा एक भाग असलेली ही नदी एकेकाळी वर्षभर वाहत असल्याचे ज्येष्ठ नागरिक सांगतात. मात्र, गेल्या काही वर्षांत नदीपात्राच्या दोन्ही बाजूंनी झालेली बांधकामे, वाढलेली अतिक्रमणे आणि नदीत मिसळणारे सांडपाणी यामुळे नदीचे मूळ स्वरूप बदलत चालले असून अनेक ठिकाणी बिंदुसरेला नाल्याचे स्वरूप आले आहे.

बीड शहरापासून काही अंतरावर असलेल्या इंग्रजकालीन धरणापासून बिंदुसरा नदीचा प्रवाह पुढे येतो. ही नदी शहराच्या मध्यवर्ती भागातून वाहत असल्याने बीडच्या भौगोलिक आणि नैसर्गिक ओळखीमध्ये तिचे महत्त्व आहे. धरणातून पुढे येणाऱ्या पाण्यामुळे नदीचा प्रवाह अनेक वर्षांपासून शहरासाठी महत्त्वाचा राहिला आहे. मात्र, शहराचा विस्तार होत असताना नदीपात्र आणि नदीकाठच्या जागेवर अतिक्रमणे वाढत गेल्याने आज नदीचे पात्र अनेक ठिकाणी अरुंद झाले आहे.



नदीपात्राच्या दोन्ही बाजूंनी जागा अडवली गेल्याने पाण्याच्या नैसर्गिक प्रवाहावर परिणाम होत आहे. काही ठिकाणी नदीची रुंदी पूर्वीच्या तुलनेत कमी झाल्याचे चित्र आहे. नदीपात्राची अधिकृत हद्द किती आणि प्रत्यक्षात नदीसाठी किती जागा शिल्लक आहे, याची प्रशासनाने पाहणी करून स्पष्टता आणणे गरजेचे आहे. नदीपात्रात किंवा नदीच्या हद्दीत अतिक्रमण झाले असल्यास ते कधी झाले, कोणाच्या मालकीची जागा आहे आणि संबंधित बांधकामांना परवानगी आहे का, याचीही तपासणी होणे आवश्यक आहे.

पावसाळ्यात बिंदुसरा नदीला मोठ्या प्रमाणात पाणी येते. अशा वेळी नदीचे पात्र अरुंद असल्यास पाण्याचा प्रवाह अडण्याची शक्यता आहे. शहरात मागील काही वर्षांत पावसाचे स्वरूपही बदलले असून कमी वेळेत मोठ्या प्रमाणात पाऊस पडण्याच्या घटना घडत आहेत. त्यामुळे नदीपात्रातील अतिक्रमणांचा प्रश्न केवळ पर्यावरणापुरता मर्यादित राहिलेला नसून भविष्यात शहरातील पूरस्थितीशीही त्याचा संबंध येऊ शकतो.

नदीच्या अस्तित्वासोबतच प्रदूषणाचाही प्रश्न गंभीर आहे. शहरातील सांडपाणी नदीत मिसळत असल्याने नदीचे पाणी दूषित होत आहे. नदीपात्रात कचरा साचणे आणि अस्वच्छता वाढणे यामुळे नदीचा परिसरही विद्रूप झाला आहे. पूर्वी शहराला नैसर्गिक सौंदर्य देणारी बिंदुसरा आज अनेक ठिकाणी अस्वच्छ आणि अरुंद झाल्याने बीडच्या सौंदर्यावरही त्याचा परिणाम होत आहे.

या परिस्थितीत प्रशासनाची भूमिका महत्त्वाची ठरते. नदीपात्राचे अधिकृत मोजमाप करून त्याची हद्द निश्चित करणे, उपलब्ध अभिलेख आणि प्रत्यक्ष जागेची पाहणी करणे तसेच नदीपात्रातील अतिक्रमणांची माहिती घेणे आवश्यक आहे. अतिक्रमणे अनधिकृत असल्याचे आढळल्यास त्यांच्यावर कारवाई करण्याची जबाबदारी संबंधित यंत्रणांची आहे. नदीत सांडपाणी सोडले जात असल्यास त्यावरही कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची गरज आहे.

बिंदुसरा नदीचा प्रश्न यापूर्वीही अनेक वेळा चर्चेत आला आहे. मात्र, नदीपात्राचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यासाठी प्रत्यक्ष मोजणी, सीमांकन आणि अतिक्रमण हटविण्याची कारवाई होणे गरजेचे आहे. केवळ नदी स्वच्छ करण्याच्या मोहिमा राबवून प्रश्न सुटणार नाही. नदीचे पात्रच सुरक्षित राहिले नाही, तर भविष्यात नदीचा नैसर्गिक प्रवाह कायम ठेवणे कठीण होईल. ◀◀ पान २ वर

## पाटोद्यात 'वैराग्यमूर्ती श्री संत वामन भाऊ महाराज चौक' नामफलकाचे उत्साहात अनावरण

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहरातील माऊली नगर येथे आज सकाळी १०:३० वाजता अत्यंत भक्तिमय, उत्साही व आनंदी वातावरणात 'वैराग्यमूर्ती श्री संत वामन भाऊ महाराज चौक' नामफलकाचे उद्घाटन संपन्न झाले.

सोहळ्याच्या प्रारंभी वैराग्यमूर्ती श्री संत वामन भाऊ महाराज यांच्या प्रतिमेस व नामफलकास पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. माऊली नगर परिसरातील तरुण मित्र मंडळ, ग्रामस्थ व ज्येष्ठ नागरिकांच्या उत्स्फूर्त



उपस्थितीमुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे व उत्सवाचे वातावरण निर्माण झाले होते.

या सोहळ्यास परिसरातील प्रमुख लोकप्रतिनिधी, विविध क्षेत्रांतील पदाधिकारी व मान्यवर वरिष्ठतेनुसार खालीलप्रमाणे उपस्थित होते.

प्रमुख उपस्थित मान्यवर:

माजी सभापती महेंद्र तात्या गर्जे, उपनगर अध्यक्ष रोहिदास गिते, सभापती किशोर अडगळे सभापती रामेश्वर गोरे, विकास सानप (उपसरपंच, वरझडी) कलीम शेठ व्यापारी, योगेश सानप (ग्रामपंचायत सदस्य) सतीश गर्जे (पत्रकार, राज्य लोकतंत्र) गणेश खाडे (मेजर / फौजी) उपस्थित तरुण मित्र मंडळ व नागरिक: मनोज राख दीपक दादा गर्जे

निलेश दयफळे, सूरज सानप, निखिल राख, श्रीरंग सानप, सागर गर्जे, तुषार बांगर, ओम घुले, संकेत गर्जे, आदर्श सानप, महादेव राख, ◀◀ पान २ वर

## स्वातंत्र्य सेनानी रामराव आवारगावकर विधी महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी डॉ. शेख अनिसूर रहमान यांची नियुक्ती

बीड । प्रतिनिधी

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या बीड येथील नामांकित स्वातंत्र्य सेनानी रामराव आवारगावकर विधी महाविद्यालयाच्या प्राचार्य पदी डॉ. शेख अनिसूर रहमान यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल शिक्षण, विधी व सामाजिक क्षेत्रातून मोठे स्वागत होत आहे.

डॉ. शेख अनिसूर रहमान यांनी याच महाविद्यालयात सहयोगी प्राध्यापक म्हणून सुमारे १७ वर्षे अखंड व निष्ठापूर्वक



सेवा बजावली आहे. विधी शिक्षणातील प्रदीर्घ अध्यापनाचा अनुभव, उत्कृष्ट प्रशासकीय कौशल्य आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने राबविलेले विविध उपक्रम यांमुळे त्यांची प्राचार्यपदी झालेली निवड अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

त्यांच्या या निवडीबद्दल मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा.आ. श्री. प्रकाशदादा सोळंके तसेच सरचिटणीस मा. आ. श्री. सतीशभाऊ चव्हाण व कोषाध्यक्ष मा. श्री . किरणकुमार आवरगावकर यांनी त्यांचे विशेष सत्कार करून भावी वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या सर्व सन्माननीय नियामक मंडळ सदस्यांनीही त्यांच्या नियुक्तीचे स्वागत केले आहे.

तसेच महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन मा. आ .श्री. राजेंद्र जगताप साहेब आणि महाविद्यालय विकास समितीच्या सर्व सदस्यांनी डॉ. शेख अनिसुर रहमान यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. ◀◀ पान २ वर

## धगधगत्या वडवणीत आ.प्रकाश सोळंकेनी निर्माण केला सामाजिक सलोखा

वडवणी । प्रतिनिधी

काही दिवसांपूर्वी वडवणी शहरात निर्माण झालेल्या तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शहरातील शांतता व सामाजिक सलोखा पुन्हा दृढ व्हावा, यासाठी शांतता समितीची बैठक घेण्यात आली.यावेळी व्यासपिठावर पोलीस उपअधीक्षक, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, पोलीस निरीक्षक, मुख्याधिकारी यांच्यासह नगराध्यक्ष शेषराव जगताप,मा. नगराध्यक्ष राजाभाऊ अण्णा मुंडे, सुधीरभाऊ ढोले ,संभाजी तात्या शिंदे, नवनाथराव म्हेत्रे , अस्लम कुरेशी,बाबरी मुंडे , शहराध्यक्ष गणेश म्हेत्रे उपस्थित होते.

आमदार प्रकाशदादा सोळंके यांनी सामाजिक शांततेच्या बैठकीत उपस्थित नागरिक, विविध समाजघटकांचे प्रतिनिधी



आणि मान्यवरांची मते जाणून घेतली. वडवणी शहराने आजवर जपलेला सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि परस्पर सामंजस्याची परंपरा यापुढेही कायम ठेवण्यासाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करण्याची भूमिका यावेळी व्यक्त केली.

यावेळी बोलताना आ.सोळंके म्हणाले की,

घडलेली घटना ही वाहन पार्किंगच्या किरकोळ कारणातून घडली, मात्र त्याचे स्वरूप धार्मिक वादाच्या दिशेने गेले, भविष्यात अशा किरकोळ घटनांना वेगळे स्वरूप प्राप्त होऊ नये, यासाठी प्रत्येक समाजातील अशा प्रवृत्तींना वेळीच आळा घालणे आवश्यक आहे.घडलेल्या घटनेची कायद्यानुसार चौकशी होऊन दोषींवर योग्य ती कठोर कारवाई झालीच पाहिजे, ही आमची स्पष्ट भूमिका आहे. पोलिसांनी तपासाची पूर्तता करून दोषींवर कायद्यानुसार कठोरातील कठोर कारवाई करावी, अशा सूचनाही यावेळी करण्यात आल्या. मात्र, या कारवाई सोबतच शहरातील सामाजिक सलोखा आणि शांततेला कोणत्याही परिस्थितीत तडा जाऊ नये, हीदेखील अपेक्षा व्यक्त केली.वडवणी शहरातील नागरिक आजवर गुण्यागोविंदाने आणि परस्पर सामंजस्याने राहत आले आहेत. हा सामाजिक सलोखा हीच वडवणीची खरी ओळख आणि लौकिक आहे. शहरातील वाद शहरातील नागरिकांनी परस्पर संवाद, संयम आणि सामंजस्यातून सोडविले तर कोणत्याही बाहेरील व्यक्तीला परिस्थितीचा गैरफायदा घेऊन वाद चिघळविण्याची संधी मिळणार नाही.वडवणीकरांचा हा लौकिक यापुढेही अबाधित राहील आणि शहरातील शांतता व सामाजिक

## शिशुगृहातील दोन बालकांच्या कायदेशीर नातेवाईकांचा शोध सुरू

बीड । प्रतिनिधी

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयामार्फत दत्तक प्रक्रियेच्या अनुषंगाने एक महत्त्वाची नोटीस प्रसिद्ध करण्यात आली आहे. शिशुगृहात दाखल असलेल्या बालिका आयारा आणि बालक भार्गव या दोन बालकांच्या पालकांचा अथवा कायदेशीर नातेवाईकांचा शोध घेतला जात असून त्यांच्यासाठी ही जाहीर प्रसिद्धी देण्यात आली आहे.

**३० दिवसांनंतर दत्तक प्रक्रियेबाबत होणार निर्णय**

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी दिलेल्या माहितीनुसार, बालिका आयारा ही बालिका १७ एप्रिल २०२५ रोजी शिशुगृहात दाखल झाली आहे. तर बालक भार्गव हा बालक २३ डिसेंबर २०२४ रोजी शिशुगृहात दाखल झाला आहे. या दोन्ही बालकांची माहिती आणि छायाचित्रे दत्तक प्रक्रियेसाठी पाठविण्यात आली आहेत. तत्पूर्वी कायद्यानुसार त्यांच्या मूळ पालकांचा किंवा नातेवाईकांचा शोध घेणे आवश्यक असल्याने प्रसिद्धीपत्रक जारी करण्यात आले आहे. बातमी वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत संबंधित बालकांच्या पालकांनी किंवा नातेवाईकांनी आवश्यक पुराव्यांसह कार्यालयांशी संपर्क साधावा. जर दिलेल्या ३० दिवसांच्या मुदतीत कोणीही नातेवाईक समोर आले नाहीत, तर बालकल्याण समिती या बालकांच्या भविष्याबाबत आणि दत्तक प्रक्रियेबाबत कायद्यानुसार योग्य तो पुढील निर्णय घेईल, असे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, बीड यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## खरेदीखत फेरफार रद्द करण्याची मागणी

### गायकवाड विष्णू सुखदेव यांचे मंडळ अधिकाऱ्यांना निवेदन

माजलगाव । प्रतिनिधी

खरेदीखताच्या आधारे करण्यात आलेला फेरफार रद्द अथवा तहकूब करण्यात यावा, अशी मागणी करत गायकवाड विष्णू सुखदेव रा. माजलगाव यांनी माजलगाव महसूल मंडळाच्या मंडळ अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे



विष्णु सुखदेव गायकवाड यांनी मंडळधिकारी माजलगाव यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, खरेदीखत क्र. ३२८६/२०२६ दि. ०२ जुन २०२६ रोजीच्या आधारे फेरफार क्र. १५३४७ मंजूर करण्यात आला आहे. मात्र, सदर खरेदीखत हे केवळ ७/१२ वर नाव असल्याचा गैरफायदा घेऊन करण्यात आले असून, प्रत्यक्ष पाहणी केली असता सदर जमिनीची यापूर्वीच विक्री झालेली असून ताबाही देण्यात आलेला आहे. संबंधित जमिनीचा पूर्वीचा खरेदीखत क्रमांक १/२००८ असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तसेच,खरेदीखत क्र.०१/२००८ मध्ये मयत ईब्राहिम गैबू बागवान यांनी प्लॉट क्र.३,गट क्र. ७/६ मधील जागा गायकवाड यांना विक्री केली असून, त्याच दिवशी ताबाही दिलेला आहे. सदर ताबा आजतागायत कायम असल्याचे निवेदनात म्हटले आहे.मात्र, त्यानंतरच्या खरेदीखतात माजलगाव शिवारीतील प्लॉट असल्याचे दाखवून कागदपत्रे जोडण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणातील नोंद दुरुस्त करण्यासाठी माजलगाव दिवाणी न्यायालयात दावा दाखल करण्यात आला असून,तो न्यायप्रविष्ट आहे. दरम्यान,मयत ईब्राहिम गैबू बागवान यांच्या वारसांनी दि. ०२ जुन २०२६ रोजी दस्त क्र.३२८६ खरेदीखताच्या आधारे पूर्वीच्या खरेदीखतातील जागेची पुन्हा विक्री केली असल्याने सदर खरेदीखताच्या आधारे करण्यात आलेला फेरफार क्र.१५३४७ रद्द होणे आवश्यक असल्याची मागणी करण्यात आली आहे.फेरफार मंजूर झाल्यास खरेदीदार बळाचा वापर करून ताबा घेण्याची शक्यता असून,त्यामुळे सामाजिक शांतता भंग होण्याची शक्यता आहे, असा दावा निवेदनात करण्यात आला आहे.त्यामुळे न्यायालयातील प्रकरणाचा अंतिम निर्णय होईपर्यंत फेरफार क्र. १५३४७ स्थगित करावा अथवा रद्द/तहकूब करावा,अशी मागणी अर्जदार गायकवाड विष्णू सुखदेव यांनी मंडळधिकारी माजलगाव यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

## प्रवीण गिरी यांना राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार

घाटनांदुर । प्रतिनिधी

दशनाम गोसावी समाज उत्कर्ष मंडळ,लातूर चे संस्थापक प्रवीण गिरी यांना राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्काराने नुकतेच सन्मानित करण्यात आले. दशनाम गोसावी समाज परिषद महाराष्ट्र राज्य आयोजित दुसऱ्या राज्यस्तरीय महाधिवेशनात यशवंतराव चव्हाण नाट्यगृह , बीड येथे गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित यांच्या उपस्थितीत ह भ प नारायण महाराज गिरी उत्तरेश्वर पिंपरीकर तथा ह भ प शांती ब्रह्म महादेव महाराज गिरी चाकरवाडीकर यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला.

प्रवीण गिरी यांचे शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात महत्वपूर्ण



योगदान असून मागील पंधरा वर्षापासून महाराष्ट्र शिक्षण समिती , निलंगा द्वारा संचलित महाराष्ट्र विद्यालय , मुदगड(ए) येथे शैक्षणिक योगदानासोबतच मागील दोन दशकात गोसावी समाजासाठी ही महत्वपूर्ण कार्य केले असून जिल्ह्यातील व जिल्हा बाहेर समाजाच्या विविध समस्येसाठी न्याय मिळवून देण्यासाठी योगदान दिले आहे यापूर्वीही परभणी , पुणे , उमरगा नांदेड , निलंगा व लातूर येथे अनेक पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. पुरस्कार समयी सुप्रसिद्ध शिवचरित्रकार प्रा. यशवंत गोसावी , युवा व्याख्याते राहुलगिरी महाधिवेशनाचे अध्यक्ष ड. जे बी गिरी डॉ. संजय पुरी , धनंजय ओंबासे , अण्णासाहेब शिंदे , विश्वजित देशपांडे , गंगाधर काळकुटे(मराठा क्रांती मोर्चा ) शंकर देशमुख (जिल्हाध्यक्ष भाजपा) सूर्यभान गोसावी , साहेबराव गोसावी , प्रतीक गोसावी , लक्ष्मण पुरी , वसंत गोसावी , गणेश गोसावी , प्रा. रमेश भारती (कर्मवीर क्लासेस लातूर ) महंत महादेव गिरी (अंतरवली सराटी) महंत शुक्ल भारती महाराज प्रा. डॉ. मकरंद गिरी , दशनाम गोसावी वुमेन्स विंग , लातूर आदी मान्यवरांच्या हस्ते प्रवीण गिरी व ◀◀ पान २ वर

## युवा महोत्सवातून मिळणारी ऊर्जा विद्यार्थिनींच्या भविष्यासाठी उपयुक्त ठरेल : डॉ. विलास नांदवडेकर

बीड । प्रतिनिधी

युवा महोत्सव हा विद्यार्थिनींना आपली कला, कौशल्य आणि प्रतिभा सादर करण्याची उत्तम संधी उपलब्ध करून देतो. या महोत्सवात सहभागी होऊन विद्यार्थिनी विविध कला प्रकारांचे सादरीकरण करणार आहेत. या सादरीकरणातून मिळणारी ऊर्जा, आत्मविश्वास आणि अनुभव त्यांच्या पुढील आयुष्यात निश्चितच उपयोगी ठरेल, असा ठाम विश्वास एसएनडीटी महिला विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी व्यक्त केला.

एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभाग आणि तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित उत्तर महाराष्ट्र प्रादेशिक युवा महोत्सव २०२६चा भव्य उद्घाटन सोहळा रविवार, ३० ऑगस्ट रोजी शाहूनगर येथील रामकृष्ण लॉन्स



येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

महोत्सवाच्या प्रारंभी बीड शहरातून भव्य व नेत्रदीपक सांस्कृतिक शोभायात्रा काढण्यात आली. यामध्ये मराठवाडा, विदर्भ आणि खानदेशातून आलेल्या विद्यार्थिनींनी पारंपरिक वेशभूषा, ढोल-ताशांचा गजर आणि आकर्षक चित्ररथांच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या समृद्ध लोकसंस्कृतीचे दर्शन घडवले. विविध संस्कृतींचा मिलाफ असलेल्या या शोभायात्रेने सर्व बीडकरांचे लक्ष वेधून घेतले.

शोभायात्रेनंतर रामकृष्ण लॉन्स येथे मुख्य उद्घाटन सोहळा पार पडला. मुंबई विद्यापीठाच्या लोककला अकादमीचे प्रमुख प्रो. डॉ.

## भाजपाचे वडवणी शहराध्यक्ष श्रीमंत मुंडे अनंतात विलीन

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी भाजपाचे कर्तव्यदक्ष शहराध्यक्ष तथा समाजसेवक व उद्योजक श्रीमंत मुंडे यांना अल्पशा आजाराने अखेर मरणाला गाठले. परवा रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास त्यांची खाजगी हॉस्पिटलमध्ये प्राणज्योत मालवली आहे. काल दुपारी एक वाजण्याच्या सुमारास शोकाकुल वातावरणात बन्सीधर मुंडे इंग्लिश स्कूल परिसरात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. एक मार्गदर्शक खंबीर पाठीराखा आणि समाज ध्येयवेढा माणूस काळाच्या पडद्याआड गेल्याने वडवणीकरांमधून हळहळ व्यक्त केली जात आहे.



वडवणीचे उपनगराध्यक्ष बन्सीधर मुंडे यांच्या घराण्यातील कनिष्ठ बंधू म्हणून श्रीमंत मुंडे यांची ओळख होती. अतिशय कमी वयामध्ये राजकारणाचे धडे गिरवत या क्षेत्रामध्ये स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांची विचारधारा घेऊन समाज व राजकारणातील धडे गिरवण्याचा श्रीमंत मुंडे यांनी कटाक्ष प्रयत्न केला. म्हणूनच त्यांना या परिसरात 'तात्या' म्हणून संबोधले जायचे. श्रीमंत मुंडे यांनी आपल्या जिव्हाळयाचा विचाराचा आणि स्नेहभावाचा खूप मोठा परिवार जमवला होता. आणि तितक्याच ताकतीने त्यांच्या पाठीमागे देखील उभा होता. त्यांच्या माध्यमातूनच अनेक समाजहिताचे देखील कार्य केले.राजकारणात देखील त्यांनी स्वतःचा व्यक्तिगत ठसा उमटला होता. भाजपाने त्यांना वडवणी शहराध्यक्ष पदाची धुरा बहाल केली होती. यामाध्यमातूनच श्रीमंत मुंडे यांनी समाज आणि राजकारण ची सांगड घालत सर्वसामान्य माणसाची कामे मार्ग लावत होते गेल्या नगरपंचायतीच्या निवडणुकीत बंधू बन्सीधर मुंडे यांच्या विजयात बलाढ्य असा सिंहाचा त्यांचा वाटा होता. उपनगरध्यक्षपदा निवडणुकीत ◀◀ पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायलयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26